❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : ३२१ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या** नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



बांबू लागवडीतून इथेनॉल निर्मितीवर भर

वनविभागाला गडचिरोलीत वैद्यकीय महाविद्यालयासह अन्य विकासकामांनाही गती देण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

अनावश्यक वन्यजीव परवानग्यांचे अडथळे दूर करावेत



■ मुंबई (दै. संध्या)

गडचिरोलीसारख्या दुर्गम व आदिवासीबहुल जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालय, राष्ट्रीय महामार्ग आणि अन्य विकासकामे अनावश्यक वन्यजीव परवानग्यांच्या अटींमुळे प्रलंबित राहू नयेत. प्रत्यक्ष व्याघ्र भ्रमणमार्ग नसलेल्या क्षेत्रात परवानग्यांचा आग्रह धरून विकासकामांना अडथळा न करता रखडलेल्या प्रकल्पांना तातडीने गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वन विभागाच्या विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. यावेळी वनमंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, अपर मुख्य सचिव (वने) संजय खंदारे यांच्यासह प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. गडचिरोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रस्ताव प्रत्यक्ष व्याघ्र भ्रमणमार्गात येत नसल्याने या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कामकाज तात्काळ मार्गी लावावे. त्याचबरोबर, २८ किलोमीटरच्या महामार्गापैकी केवळ २ ते ३ किलोमीटरचा भाग व्याघ्र भ्रमणमार्गात येत असल्यास संपूर्ण महामार्गाचे काम थांबविणे योग्य नाही. त्यामुळे उर्वरित भागातील काम तातडीने सुरू करावे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या ३२ अधिकृत व्याघ्र भ्रमणमार्गांचेच निकष 'परिवेश' (PARIVESH) पोर्टलवर लागू करावेत. तसेच जुन्या रस्त्यांचे डांबरीकरण आणि रुंदीकरण करताना अनावश्यक अडथळे निर्माण करू नयेत, असेही निर्देश त्यांनी दिले. मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासोबतच वनालगतच्या शेतकऱ्यांना शाश्वत रोजगार आणि उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र वन विकास महामंडळ आणि एमआयडीसी यांच्या समन्वयातून बांबू लागवड व त्यापासून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. संरक्षित क्षेत्रालगत मोठ्या वृक्षांची तोड थांबवून बांबू लागवडीला प्राधान्य द्यावे. उसाच्या तुलनेत बांबूला निम्मे पाणी लागते आणि त्यापासून इथेनॉल निर्मितीची मोठी क्षमता आहे. एमआयडीसीने बांबू लागवडीसाठी जागा भाडेतत्त्वावर घेऊन शेतकऱ्यांना वार्षिक भाडे द्यावे आणि त्या माध्यमातून इथेनॉल निर्मितीचे प्रकल्प उभारावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. राज्यातील १८ लाख हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे साडेपाच लाख हेक्टर क्षेत्र सामूहिक वनहक्कांतर्गत येते.

या क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी स्थापन होणाऱ्या समित्यांचा कार्यकाळ निश्चित करावा. ग्रामसभेने स्थापन केलेल्या सामूहिक वनहक्क समित्यांचा कार्यकाळ संबंधित ग्रामपंचायतीच्या कार्यकाळाशी सुसंगत (Co-terminus) असावा. तसेच तेंदूपत्ता आणि अन्य गौण वनोपजाच्या लिलावासाठी पारदर्शक, शास्त्रीय व निश्चित कार्यपद्धती (SOP) तयार करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

भाजपा कार्यकर्त्याची माघार, जळगाव जिल्हा बँकेसाठी गिरीश महाजन बिनविरोध

■ जळगाव (दै. संध्या)

लातूर जिल्हा बँकेची निवडणूक संपन्न झाल्यानंतर आता जळगाव जिल्हा बँकेच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लातूरमध्ये सहकारमंत्री बाबासाहेब देशमुख आणि धीरज देशमुख यांच्या सहकार पॅनेलने 14-5 अशी सत्ता मिळवली आहे. आता, जळगावमध्ये जिल्हा मध्यवर्ती म्हणजेच डीसीसीच्या चाव्या कोणाच्या हाती जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महायुती म्हणून आपण ही निवडणूक लढवणार असल्याचं भाजप नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटलं होतं. त्यानंतर, आज जिल्हा बँक निवडणुकीत मंत्री गिरीश महाजन बिनविरोध विजयी झाले आहेत. तर, गुलाबराव पाटील हेही बिनविरोध झाले आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीतून भाजपा कार्यकर्ता असलेले तुकाराम विठोबा निकम यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. आपण गिरीश भाऊ यांच्या पाठीशी असल्याची प्रतिक्रिया देत तुकाराम निकम यांनी आपला पाठिंबा दिला. त्यामुळे, जळगाव जिल्हा बँकेसाठी गिरीश महाजन यांची बिनविरोध निवड झाली आहे. तर, मंत्री गुलाबराव पाटील यांचीही बिनविरोध निवड झाली आहे. जळगाव जिल्हा बँकेच्या निवडणुकीमध्ये जामनेर मतदारसंघातून मंत्री गिरीश महाजन यांच्यासह रघुनाथ पाटील आणि तुकाराम विठोबा निकम यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. दरम्यान या संदर्भात रघुनाथ

गुलाबराव पाटीलही जिंकले



पाटील यांचा अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांनी बाद केला होता त्यावर त्यांनी आव्हान देत नाशिक येथे सहाय्यक निबंधक कार्यालयात हरकत दाखल केली. मात्र, तेथे देखील त्यांचा अर्ज फेटाळून लावला. त्यामुळे, दुसरे उमेदवार तुकाराम निकम यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. आज अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी तुकाराम निकम यांनी गिरीश महाजन यांना पाठिंबा देत आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे मंत्री गिरीश महाजन हे बिनविरोध विजयी उमेदवार ठरले आहे.

थोडक्यात...

ठाण्यात ११ कोटींचे कोकेन जप्त

ठाणे : दैनिक संध्या

ठाणे जिल्ह्यातील अंमली पदार्थ तस्करीविरोधात मुंब्रा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. दिवा पूर्वेकडील बेतवडे गावातील मॅरेथॉन नेक्सवर्ल्ड सोसायटीत छापा टाकत पोलिसांनी तब्बल 11 कोटी रुपये किमतीचे कोकेन आणि मेफेड्रोन अर्थात एमडी जप्त केले आहे. या कारवाईत दोन नायजेरियन नागरिकांसह एका टांझानियन नागरिकाला अटक करण्यात आली आहे. मुंब्रा पोलिसांच्या अंमली पदार्थविरोधी पथकाला बेतवडे परिसरातील एका सोसायटीत परदेशी नागरिकांकडून अंमली पदार्थांची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जावदवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन ढगे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकाने मॅरेथॉन नेक्सवर्ल्ड सोसायटीतील औरा इमारतीच्या ३६ व्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक 3602 वर छापा टाकला.

सांगलीतील तरूणाला चिपळूणमध्ये संपवलं

चिपळूण : दैनिक संध्या

चिपळूण मधील वालोपे भागांमध्ये एका तरुणाची हत्या झाल्याच्या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. सांगली येथील नवनाथ कांबळे नावाच्या व्यक्तीला डोक्यात चिरा घालून ठार केल्याची घटना समोर आली आहे. ही हत्या नेमकी कशामुळे झाली याचा शोध चिपळूण पोलीस घेत आहेत. तर तपासासाठी फॉरेन्सिक टीम आणि श्वान पथकाला घटनास्थळी पाचरण करण्यात आलं आहे. नवनाथ कांबळे हा चिपळूणमध्ये आपल्या बहिणीकडे राहत होता अशी माहिती समोर आली असून काल (सोमवारी, ता 16) रात्री नऊ वाजता घरातून बाहेर पडला होता, तो घरी परत आला नाही असे सांगण्यात येतंय. ही हत्या नेमकी कोणत्या कारणासाठी झाली याचा तपास आता चिपळूण पोलीस करत आहे. चिपळूण पोलिस निरीक्षक प्रशांत आवारे यांनी या घटनेबाबत माहिती देताना सांगितलं की, सकाळी चिपळूण पोलीस स्टेशनच्या डायल 112 वरती एक कॉल आला होता. की वालोप्यामध्ये रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रोडवर एक व्यक्ती रक्ताच्या थरोळ्यात पडलेला आहे. त्यावरून चिपळूण पोलीस स्टेशनचे डायल ११२चे अंमलदार जे आहेत, त्यांनी तात्काळ घटनास्थळावर येऊन खात्री केली. आणि त्यांनी आम्हाला आणि इतर वरिष्ठांना माहिती दिल्यानंतर आम्ही स्वतः संपूर्ण स्टाफसह या ठिकाणी आलेलो होतो. या ठिकाणी जो झुलाई जनरल स्टोअर्स आहे, त्याच्या मागच्या बाजूला नवनाथ बबन कांबळे नावाचा ३३ वर्षे वयाचा व्यक्ती आहे. जो की मूळचा राहणार वांगी, तालुका खडेगाव, जिल्हा सांगली येथील आहे. तर तो इथे रक्ताच्या थरोळ्यात पडलेला आम्हाला दिसून आला.

ब्लु-टूथ, इस्त्रीमध्ये लपवून सोन्याची तस्करी

मुंबई विमानतळावरुन २ कोटी २६ लाखांच सोनं जप्त, दोघांना अटक



■ मुंबई (दै. संध्या)

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत जगभरातून प्रवासी, पर्यटक, उद्योजक येतात. त्यामुळे, मुंबई विमानतळावर पोलिसांचा आणि कस्टम विभागाचा कडा पहारा असतो. त्याच कस्टम विभागाने मुंबई विमानतळावरुन तब्बल 2.26 कोटींचे सोने जप्त केले असून यात दोघांना अटक करण्यात आली आहे. यापूर्वी देखील मुंबई विमानतळावरुन अंमली पदार्थ आणि सोनं, मौल्यवान वस्तुंची तस्करी होत असल्याचं निदर्शनास आलं आहे. त्यावेळी देखील पोलिसांनी कारवाई करत आरोपींना अटक केली. तर, ठाण्यातून तब्बल 11 कोटी रुपयांचे कोकेन जप्त केले आहे. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर कस्टम्स विभागाने मोठी कारवाई केली असून 16 आणि 17 नोव्हेंबरच्या मध्यरात्री एअर इंटेलिजन्स युनिटने चार वेगवेगळ्या प्रकरणांत कारवाई केली. त्यामध्ये, एकूण 1 किलो 910 ग्रॅम सोनं जप्त करण्यात आले आहे. कस्टमने जप्त केलेल्या सोन्याची एकूण किंमत तब्बल 2.26 कोटी रुपये असल्याची माहिती आहे. या सोन्याच्या वस्तूंमध्ये 24 कॅरेट सोन्याच्या विटा आणि सोन्याचे तुकडे जप्त करण्यात आले आहेत. आरोपींनी ब्लूटूथ स्पीकर आणि इलेक्ट्रिक इस्त्रीमध्येही लपवून सोन्याची तस्करी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, कस्टम अधिकाऱ्यांच्या नजरेनं ते उघडकीस आणलं. याशिवाय २२ कॅरेटचे कच्चे सोन्याचे दागिनेही जप्त करण्यात आले असून दोन प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी, पुढील तपास सुरू आहे.

तेजस्वी सातपुतेंची बदली भोंदू खरातच्या माध्यमातून झाली

चाकणकरांच्या सांगण्यावरून त्यांनी खोटे गुन्हे दाखल केले; रुपाली ठोंबरेंचा गंभीर आरोप

■ पुणे (दै. संध्या)

नाशिकचा भोंदू खरातच्या प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकरांवर पुन्हा एकदा गंभीर आरोप होताना दिसत आहेत. राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली ठोंबरे-पाटील यांनी आता त्यांच्यासह या प्रकरणातील एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांच्यावरही आरोप केले आहेत. तेजस्वी सातपुतेंच्या आतापर्यंतच्या बदल्या या खरातच्या माध्यमातून होत असायच्या असा दावा रुपाली चाकणकर करायच्या. त्यामुळेच चाकणकरांच्या सांगण्यावरून तेजस्वी सातपुतेंनी पुण्यात असताना खोटे गुन्हे दाखल केले होते, असा गंभीर आरोप रुपाली ठोंबरे यांनी केला आहे. खरात प्रकरणात रुपाली ठोंबरे यांनी रुपाली चाकणकरांना आणि तेजस्वी सातपुतेंना लक्ष्य केलं आहे. त्या म्हणाल्या की, "खरात प्रकरणातील एसआयटीच्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांची आम्ही भेट घेतली होती आणि त्यांना रुपाली चाकणकरांवर गुन्हा दाखल करण्याची विनंती केली होती. मात्र सातपुतेंनी शेवटपर्यंत चाकणकरांवर तक्रार दाखल केली नाही. मात्र रुपाली चाकणकरांवर टीका केलेल्यांवर मात्र गुन्हे दाखल करण्यात आले." तेजस्वी सातपुतेंची पुण्याला बदली झाल्यानंतर त्यांनी सात महिन्यांनी एक खोटी तक्रार दाखल केली होती.





रुपाली चाकणकरांच्या सांगण्यावरून ही तक्रार दाखल केली होती, असा आरोप रुपाली ठोंबरे यांनी केला. तेजस्वी सातपुतेंच्या आजपर्यंतच्या बदल्या या अशोक खरातच्या माध्यमातून म्हणजे स्वतःच्या माध्यमातून केल्याचं रुपाली चाकणकर सांगायच्या, असा दावा रुपाली ठोंबरे यांनी केला. खरातसोबत फोटो आहेत म्हणून त्यांच्यावर आरोप करत नाही, तर चाकणकर या खरातच्या ट्रस्टवर होत्या म्हणून त्यांच्यावर आम्ही आरोप करत आहोत, असं रुपाली ठोंबरे म्हणाल्या. त्या म्हणाल्या की, "रुपाली चाकणकरांच्या नावे, त्यांच्या बहिणीच्या आणि कुटुंबीयांच्या नावे पतसंस्थेमध्ये कोट्यवधी रुपयांचे व्यवहार झाले. असं असलं तरी त्यांना आरोपी करण्यात आलं नाही. खरातच्या अनेक आर्थिक प्रकरणांमध्ये रुपाली चाकणकरांची बहीण ही नॉमिनी आहे. असं असलं तरी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला नाही." चाकणकरांनी अनेक महिलांना, नेत्यांना अशोक खरातकडे नेलं. त्यांनी ज्या ज्या राजकारणी लोकांना खरातकडे नेलं आहे, त्यांना आता धमक्या देत आहेत. मला वाचवा नाहीतर तुमचे फोटो व्हायरल करेन अशा धमक्या चाकणकर देत आहेत. त्यातून पोलिसांना हाताशी धरून खोटे गुन्हे दाखल केले जात आहे, असा आरोप रुपाली ठोंबरे यांनी केला. रुपाली चाकणकर या अशोक खरातच्या ट्रस्टवर होत्या. त्यांनी खेमनार नावाच्या पत्रकाराला माफी मागायला लावली. रुपाली चाकणकरांच्या सांगण्यावरुन पोलिसांनी अनेक खोटे गुन्हे दाखल केले. हे सगळं रुपाली चाकणकरांनी पदाचा गैरवापर करून केला, असा आरोप रुपाली ठोंबरे यांनी केला.

अजित पवारांच्या पुतळ्यासमोर शहांनी माफी मागायला हवी होती

उद्धव ठाकरेंचा घणाघात; म्हणाले- ७० हजार कोटींचा आरोप करून जगणं मुश्किल केलं होतं, आता थोरवी गातायत

■ मुंबई (दै. संध्या)

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या 14 व्या स्मृतिदिनानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे यांनी विनम्र अभिवादन केले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. अजित पवारांच्या पुतळ्यासमोर अमित शाह यांनी माफी मागायला हवी होती, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

अजित पवार यांच्या हयातीत त्यांच्यावर ७० हजार कोटींच्या कथित घोटाळ्याचे आरोप करून त्यांचे जगणे मुश्किल करण्यात आले. मात्र, आता त्यांच्याच पुतळ्याचे अनावरण करताना अमित शाह यांनी अजित पवारांच्या कार्याची प्रशंसा केली. यावरून उद्धव ठाकरे यांनी शाह यांच्यावर निशाणा साधला. 'अजित पवारांच्या पुतळ्याचे अनावरण केल्यानंतर अमित शहा यांनी पुतळ्यासमोर माफी मागायला हवी होती. आम्ही तुमच्यावर केलेले आरोप खोटे होते, तुम्ही थोर होता, असे त्यांनी म्हणायला हवे होते. अजितदादा हयात असताना त्यांच्याबद्दल असे दोन शब्द बोलले असते, तर त्यांना समाधान मिळाले असते,' असे ठाकरे म्हणाले. कोरोना काळात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना अमित शाह यांनी अनेकदा फोन केले, मात्र ठाकरे फोन उचलत नव्हते, असा दावा शाह यांनी केला होता. यावर पत्रकारांनी विचारले असता, 'मला अमित शहा यांनी अजिबात फोन केला नव्हता. त्यांच्या बोलण्यात काहीही तथ्य नाही,' असे ठाकरेंनी स्पष्ट केले.



कोरोना काळात महाराष्ट्राने केलेल्या कामाचा उल्लेख करताना त्यांनी तत्कालीन राज्य सरकार आणि प्रशासनाचे कौतुक केले. देशात कोरोना व्यवस्थापनाच्या बाबतीत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या कामाची दखल घेतली गेली होती; मात्र त्याचे श्रेय संपूर्ण यंत्रणेला जाते, असेही त्यांनी नमूद केले. उत्तर प्रदेशमध्ये कोरोना काळात कामगारांची झालेली गैरसोय आणि गुजरातमधील अंत्यसंस्कारांच्या घटनांचा उल्लेख करत त्यांनी भाजपच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित केले. अमित शहा यांनी देशातील महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी राजकीय वक्तव्ये करण्यात वेळ घालवू नये, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. मणिपूरमधील परिस्थिती, अरुणाचल प्रदेशातील नागरिकांच्या तक्रारी आणि चीनच्या सीमेवरील परिस्थितीचा उल्लेख करत त्यांनी गृहमंत्र्यांनी संबंधित भागांना भेट द्यावी, असे आवाहन केले. 'अरुणाचलमधील लोक आक्रोश करत आहेत. तेथील नागरिक आणि सैन्याचे मनोधैर्य वाढवण्यासाठी गृहमंत्र्यांनी तिथे जावे. देशाच्या कारभाराकडे लक्ष द्यावे,' असे ठाकरे म्हणाले. जेएनयूतील घटनांचाही उल्लेख करत त्यांनी अमित शाह यांच्या संसदेतील भूमिकेवर टीका केली.

उत्तर प्रदेशातील जनतेने परिस्थिती विसरू नये

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी कोरोना काळातील परिस्थितीचा मुद्दा उपस्थित केला. मुंबईत काम करणारे अनेक उत्तर भारतीय मजूर कोरोना काळात गावी परतले होते. त्यावेळी उत्तर प्रदेशमध्ये त्यांची गैरसोय झाल्याचे आणि मुंबईतील व्यवस्था अधिक चांगली असल्याची भावना काही कामगारांनी व्यक्त केल्याचे ठाकरे म्हणाले. उत्तर प्रदेशातील गोरखपूरमध्ये ऑक्सिजनअभावी बालकांचे मृत्यू झाल्याच्या घटनेचाही त्यांनी उल्लेख केला. 'कोरोना नसतानाही ऑक्सिजनअभावी बालकांचे मृत्यू झाले होते. त्यावेळी अमित शहा यांनी संबंधित मुख्यमंत्र्यांना फोन केला होता का?', असा सवाल त्यांनी उपस्थित केला. उत्तर प्रदेशमधील जनतेने कोरोना काळातील परिस्थिती विसरू नये, असे आवाहनही त्यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार पक्षाच्या विलीनीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चेवरही उद्धव ठाकरे यांनी भाष्य केले. 'अजित पवार यांच्या पुतळ्याच्या अनावरणावेळी राष्ट्रवादीचे अनेक नेते उपस्थित होते. त्यांनी त्या पुतळ्यासमोर बसूनच विलीनीकरणाबाबतचा निर्णय घ्यायला हवा,' असे ते म्हणाले.

अजित पवार प्रकरणात सीसीटीव्ही फुटेज देण्यास नकार

■ मुंबई/बारामती (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे देवगिरी बंगला निवासस्थान ते मुंबई विमानतळ येथील सीसीटीव्ही फुटेज देण्यास नागरी विमान सुरक्षा ब्युरो विभागानंतर मुंबई पोलिसांनी देखील नकार दिल्याची माहिती बारामतीमधील वकिल अॅड. नितीन यादव यांनी दिली आहे. राज्याचे दिवंगत लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे जे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले होते. त्या अनुषंगाने राज्यभरातील जनतेत व आदरणीय दादाप्रेमीमध्ये एक शंका व जनभावना होती की, आदरणीय दादांचा अपघात झाला त्या दिवसाचे मुंबई विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज मिळावे. याच अनुषंगाने मी केंद्र सरकारच्या नागरी विमान वाहतुकालय विभागास दि.28जानेवारी 2026 रोजीचे मुंबई विमानतळावरील पहाटे 6 ते सकाळी 9 दरम्यानचे सिसिटीव्ही फुटेजची मागणी केली होती परंतु त्यांनी ती माझी मागणी नाकारत मला सीसीटीव्ही फुटेज दिले नाही, असं नितीन यादव यांनी म्हटलं आहे. अजितदादा पवार यांचे 28 जानेवारीचे मुंबईतील शासकीय देवगिरी निवासस्थान ते मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील देखील सीसीटीव्ही फुटेज मी माहिती अधिकारात मागवले होते.ते फुटेज जे की महाराष्ट्र राज्य सरकारच्या गृह विभागाच्या अखत्यारीत येते तेही देण्यास मुंबई पोलीसांनी सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी ती माहिती संबंधित नाही असे धक्कादायक उत्तर देत नाकारले आहे.

संपादकीय

सहकार जिवंत ठेवायचा का नाही?

२७ ऑक्टोबरला दुष्काळाचे कारण देत दुष्काळग्रस्त भागातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढील आदेशापर्यंत स्थगित झाल्या. चार नोव्हेंबरला मंत्रिमंडळाने दोन सुधारणांना आणि त्यासाठी अध्यादेशाला मान्यता दिली. ५०० कोटीहून अधिक उलाढालीच्या सहकारी संस्थावर सरकार नियुक्त पाच सदस्य, आणि निवडणूक रखडलेल्या मोठ्या संस्थावर प्रशासक न नेमता विद्यमान संचालकांनाच पुढे कार्यरत ठेवणे. त्यामुळे सभासदांचे मत लांबीवर पडले, सरकारच्या नेमणूका मात्र तातडीने झाल्या. तिन्ही निर्णय एकत्र वाचले की त्यांच्यातील विसंगती लपत नाही. महाराष्ट्र शासनाच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३(२) अन्वये मध्ये सुधारणा करून सरकारी मदत घेणाऱ्या आणि पाचशे कोटीहून अधिक उलाढालीच्या संस्थावर पाच सदस्य नेमले जातील. त्यातील शासकीय अधिकारी मत देणार नाही. उरलेल्या चौघांना मताधिकार असेल. पण ते पदाधिकारी होऊ शकणार नाही. जिल्हा मध्यवर्ती बँकांना हा बदल लागू नाही. संचालक मंडळातील कोंडी, आणि गणपूर्तीच्या अडचणी टाळणे. हा उद्देश सरकार सांगते. महाधिवक्त्यांचा सल्ला घेऊन निर्णय घेतल्याचे सरकारचे म्हणणे आहे. पण कोल्हापूरच्या गोकुळ मध्ये कोंडी केली कुणी?... तिथे एका आघाडीचे १३ आणि सत्ताधारी आघाडी समर्थित पॅनेलचे १२ संचालक निवडून आले. अध्यक्ष निवडीच्या बैठकीला अल्पमतातील संचालक गैरहजर राहिले. आणि गणपूर्ती झाली नाही. ही कोंडी न्यायालयाने आधीच फोडली होती. २ नोव्हेंबरला मुंबई उच्च न्यायालयाने सर्व पंचवीस संचालकांना नोटीस देऊन १० नोव्हेंबरला अध्यक्ष निवडीची बैठक घेण्याचे आदेश दिले. त्यानंतर दोनच दिवसात मंत्रिमंडळाने नियम बदलले. आणि त्या बैठकीपूर्वीच नेमणुका व्हाव्यात म्हणून प्रशासनाने धावाधाव केली. असे वृत्त आहे. १३ विरुद्ध १२ अशा संचालक मंडळात ४ नवी मते आली, की बहुमत अल्पमतात बदलते. म्हणजे कोंडी करणाऱ्याच्या बाजूलाच फायदा. हे सदस्य पदाधिकारी होणार नाहीत हे समाधानही फसवे आहे. पदाधिकारी कोण होणार हे ठरवणे हे सुद्धा सत्ताच आहे. जनतेचा पैसा घेणाऱ्या संस्थेने हिशोब द्यायलाच हवा यात वाद नाही.पण हिशोब मागणे आणि निर्णयांमध्ये या वेगळ्या गोष्टी आहेत स्वतंत्र लेखापरीक्षण मदतीच्या स्पष्ट अटी आणि दोषीवर कारवाई हे मार्ग अपुरे कसे हे सरकारने सांगितलेले नाही?... मदतीच्या बदल्यात करण्याचा अधिकार सरकारकडे जाणार असेल तर ती मदत राहत नाही तो सौदा ठरतो. आणि हा बदल प्रत्यक्षात मोजके संस्था पुरताच होणार असेल तर ती सर्वसाधारण सुधारणा राहत नाही. एका संस्थेसाठी ठरवून केलेली सोय ठरते. राज्यातील ३०४ तालुके दुष्काळी जाहीर झाल्यावर तिथल्या सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर होत्या, तिथेच थांबल्या.दुष्काळात यंत्रणेवर ताण असतो. आणि अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मतदानासाठी जाणे शक्य असतेच असे नाही, हे समजण्यासारखे आहे.पण "पुढील आदेशापर्यंत "ही मुदत नसते. निवडणुका केव्हा आणि कोणत्या निकषावर पुन्हा सुरू होतील, हे स्थगितीच्या आदेशात ठरलेले नाही.या तिन्ही निर्णयामध्ये एकच सूत्र नाही. सोयीनुसार भूमिका बदलते. एका ठिकाणी नुकत्याच निवडून आलेल्या मंडळावर सरकारचा विश्वास नाही, म्हणून त्या सरकारी मते घुसवली जातात. दुसऱ्या ठिकाणी मुदत संपलेल्या मंडळावर इतका विश्वास,की निवडणुकाशिवाय त्यांना पुढे कायम ठेवले जाते. न्यायालयाने लोकशाही प्रक्रियेची वाट मोकळी केली तर, सरकार ती वाटच बदलते. दुष्काळामुळे निवडणुका घ्यायला अधिकारी नाहीत. पण त्याच दुष्काळात नियम बदलून नेमणुका करण्याची तत्परता आहे. पारदर्शकतेचा दावा केला जातो. पण विधिमंडळात चर्चा न करता अध्यादेशाचा मार्ग निवडला जातो. निकष एकच असता तर,सभासदांचा कौल दोन्ही ठिकाणी सर्वोच्च ठरला असता. ही विसंगती केंद्राच्या धोरणाशी आहे जुलै २०२५ मध्ये जाहीर झालेल्या राष्ट्रीय सहकार धोरणाच्या पहिल्या स्तंभात राज्यांनी आपले सहकार कायदे बदलावेत,असे सुचवले आहे. संस्थाचे स्वायत्त कामकाज आणि सभासदांचे लोकशाही नियंत्रण सुनिश्चित करण्यासाठी आणि संचालक मंडळ व पदाधिकाऱ्यांच्या मुक्त आणि निपक्ष निवडणुकांसाठी महाराष्ट्र कायदे बदलतो आहे खरा, पण उलट्या दिशेने?... स्वायत्ततेचे ऐवजी सरकारी मते आणि मुदतीत निवडणूकाऐवजी विना मुदत स्थगिती घेतली. सहकारातून समृद्धीची घोषणा सभासदांच्या मताशिवाय पूर्ण होत नाही. ऑगस्ट२०२२ मध्ये गुजरात उच्च न्यायालयाने अमोल डेअरी वरील तीन सरकार नियुक्त सदस्याच्या नेमणुका तेथील कायद्याशी सुसंगत नसल्याने रद्द केल्या. ज्या बदलाचा पहिला परिणाम एका वादग्रस्त संस्थेवर दिसतो. आणि जो न्यायालयाने ठरवलेला बैठकीच्या तोंडावर आणला जातो. तो सूडबुध्दीने व आकसाने आणला गेला का?..हा प्रश्न आता न्यायालयासमोर आहे. उच्च न्यायालयाने अध्यादेशाला स्थगिती दिली नाही. पण सरकार नियुक्तीची मतं स्वतंत्र ठेवण्याचे, आणि अध्यक्ष निवड अंतिम निकालाच्या आधीन ठेवण्याचे आदेश दिले. पुढील सुनावणी २५ नोव्हेंबरला आहे. सरकारच्या बाजूने एक आक्षेप नेहमी घेतला जातो सहकार क्षेत्र अधिक राजकारण्यांच्या ताब्यात आहे.साखर कारखाने,आणि जिल्हा बँका, या सत्तेच्या शिडीच्या पहिली पायरी झाल्या आहेत. मग सरकारने हस्तक्षेप केला तर बिघडले कुठे?... हा आक्षेप अर्धाच खरा आहे. प्रवरानगरला पहिला सहकारी साखर कारखाना विठ्ठलराव विखे पाटील, यांनी धनंजयराव गाडगीळ यांनी उभारला. शेतकऱ्यांना सावकार, आणि व्यापाऱ्यांच्या, पकडीतून सोडवण्यासाठी हा कारखाना उभा केला होता. कालांतराने त्या संस्थांमधून राजकीय घराणेशाही उभी राहिली.हेही खरेच आहे. सभासदांना अधिक बळ देणे, हा त्यावरचा उपाय आहे. त्याच्या मता शेजारी सरकारी मते बसवणे नव्हे?..सभासदाला आणखी बाजूला सारले तरी एका गटा ऐवजी दुसरा गट येईल.संस्थेवरची पकड बदलेल, पकडीचे स्वरूप तसेच राहील. सहकारातील राजकारणावर अधिक राजकारण हा नाही तर, अधिक लोकशाही हा इलाज असतो. म्हणून सरकारने करावयाचे उपायही सभासद केंद्री असायला हवेत. आणि त्याची कसोटी एकच प्रत्येक निर्णयानंतर सभासदाचे मत बळकट झाले की कमकुवत?...दुष्काळाचे कारण प्रामाणिक आहे.सरकारला दाखवायचे असेल तर निवडणूक स्थगितीला काल मर्यादा द्यावी. आणि हंगाम पाहून टप्प्या टप्प्याने निवडणूक घेण्याचा निर्णय राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोडावा. पारदर्शकतेचा दावा खरा असेल तर हा बदल लागू होणाऱ्या संस्थांची यादी, सरकार नियुक्त सदस्याचे पात्रता, आणि निवडीची कारणे, स्वतःहून जाहीर करावी. त्यांना देखरेखीपुरतेच ठेवावे. मताधिकार देऊ नये. मुदतवाढ मिळालेल्या मंडळांना त्या काळात मोठे आर्थिक निर्णय घेण्यास सक्त मनाई असावी. संस्था आमची म्हणणाऱ्या संचालकांनी कंत्राटे, दूधदर,आणि लेखापरीक्षणाचा हिशोब सभासदासमोर खुला करावा. सहकाराचा पाया "एक सभासद एक मत हा आहे" मत अनिश्चित काळ लांबणीवर पडले,आणि सरकारी मताची वरून भर होऊ लागली तर सभासद हे फक्त भागधारकांच्या यादीतील नावापुरतेच राहातील.आजच्या सत्ताधाऱ्यांनी स्वतःला एवढेच विचारावे उद्या विरोधात बसल्यावर ही व्यवस्था त्यांना न्याय वाटेल का?.... कुठे निवडणूक अनिश्चित काळासाठी पुढे ढकलल्या तर कुठे सरकार नियुक्त सदस्यांना मतदानाचा अधिकार दिला जाणे या महाराष्ट्र सरकारच्या सहकार संदर्भातील अलीकडच्या निर्णयांनी या क्षेत्राच्या पायाला धक्का बसण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. सरकारी हस्तक्षेपामुळे सहकारी संस्थांच्या स्वायत्ततेला धोका निर्माण होणे हे काही निरोगी आणि निकोप लोकशाहीचे लक्षण नाही. असे सर्वसामान्य सभासदांनी म्हटले तर वावगे ठरू नये. महाराष्ट्रात सहकार चळवळ वाढवण्यासाठी धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, वसंतदादा पाटील. गुलाबराव पाटील. यशवंतराव चव्हाण. आप्पासाहेब पवार. शंकरराव मोहिते पाटील, यशवंतराव मोहिते, जयवंतराव भोसले, तात्यासाहेब कोरे, रत्नाप्पा कुंभार, पतंगराव कदम, शरदराव पवार, कर्मवीर काकासाहेब वाघ, शंकरराव चव्हाण, विलासराव देशमुख, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे,यशवंतराव गडाख, मारोतराव घुले पाटील, दौलतराव आहेर, राजारामबापू पाटील, यासारख्या जेष्ठ सहकार तज्ञानी सहकारी साखर कारखाने,सूतगिरण्या, जिल्हा दूध संघ, मार्केट कमिटी, सारख्या संस्था उभ्या केल्या. आणि त्यामधून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना, आणि शेतमजुरांना स्वयंपूर्ण बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांचे परिश्रम हे निश्चितच कौतुकास्पद आहे.परंतु सध्या सहकार चळवळ, सहकारी साखर कारखाने,सहकारी दूध संस्था, बंद करण्यासाठी सरकारी धोरणे कारणीभूत ठरत आहेत.हे निश्चितच खेदजनक आहे. "सहकार वाचवा" अशी म्हणण्याची आता वेळ आलेली आहे.हे निश्चितच खेदजनक आहे यावर उपाय निर्माण होणे आवश्यक आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप, ३५ हजार कर्मचाऱ्यांचा सहभाग

न्यायालयीन कामकाज ठप्प

■ नारायणगाव (दै. संध्या)

वेतनवाढीचा प्रस्ताव रखडल्याने राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी (दि.१७ नोव्हें) पासून बेमुदत संप पुकारला आहे. या संपात राज्यातील ३५ हजार न्यायालयीन कर्मचारी सहभागी झाले आहेत. संपामुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम होऊन न्यायालयीन कामकाज ठप्प झालेले आहे.'वेतनवाढीचा प्रस्ताव २२ महिन्यांपासून रखडला आहे.



यापूर्वी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून सरकारचे लक्ष वेधले होते, तसेच सामूहिक रजा आंदोलन केले होते. न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर विचार न झाल्याने महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट क) संघटनेने मंगळवारपासून बेमुदत संप पुकारला आहे', अशी माहिती जुन्नर न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी यांनी दिली.

'न्यायालयात अपुरे मनुष्यबळ आहे. न्यायालयात दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या वाढती आहे. कामाचे स्वरुप विचार घेता वेतनात तफावत आहे. वेतनवाढीचा प्रस्ताव गेल्या २२ महिन्यांपासून प्रलंबित आहे. वेतनवाढीकडे दुर्लक्ष केल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत संप सुरू ठेवणार आहोत', असे त्यांनी नमूद केले. 'दिवाळीच्या सुट्टीनंतर न्यायालयीन कामकाज सुरू झाले. न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारल्याने पक्षकारांसह वकिलांची गैरसोय होत आहे. नवीन दावे दाखल करणे, अर्ज नोंदणी, आदेशांची प्रमाणित प्रत मिळविणे, जामीन आदेशांच्या अंमलबजावणीत अडचण निर्माण होऊ लागल्या आहेत. त्यामुळे शासनाने त्वरीत दखल घ्यावी अशी मागणी न्यायालयीन कर्मचारी संघटनांनी केली आहे.

पिंपळवंडीतील पीडित कुटुंबाला पाच लाखांचे अर्थसहाय्य



■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे अल्पवयीन बालिकेवरील अत्याचार आणि तिच्या मृत्यूच्या दुर्दैवी घटनेनंतर पीडित कुटुंबाला आर्थिक आधार देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वेल्फेअर फंडातून पाच लाख रुपयांची मदत देण्यात आली. माजी आमदार अतुल बेनके, भीमाशंकर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांच्या हस्ते ही मदत कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आली.


राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून ही मदत देण्यात आली. १८ ऑगस्ट २०२६ रोजी पिंपळवंडी येथे अल्पवयीन बालिकेवर अत्याचाराची घटना घडली होती. या घटनेत बालिकेचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. घटनेनंतर २७ ऑगस्ट २०२६ रोजी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील आणि माजी आमदार अतुल बेनके यांनी पीडित कुटुंबाची त्यांच्या घरी भेट घेऊन सांत्वन केले होते. यावेळी पीडित कुटुंबावर पतसंस्था आणि फायनान्स बँकेचे कर्ज असल्याची बाब समोर आली होती. कुटुंबाला आर्थिक मदत मिळावी आणि त्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणता यावे, या उद्देशाने माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. ही रक्कम १३ नोव्हेंबर २०२६ रोजी नारायणगाव येथील माजी आमदार अतुल बेनके यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात पीडित कुटुंबीयांना देण्यात आली.

अध्यक्षपदी चंद्रगुप्त शाह वाघोलीकर तर सदस्यपदी धवल शाह

■ बारामती (दै. संध्या)

अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी चंद्रगुप्त माणिकलाल शाह वाघोलीकर यांची दोन दिवसा पूर्वी नुकतीच झालेल्या नियामक मंडळाच्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली. संस्थेचे माजी अध्यक्ष स्वर्गीय जवाहर शाह वाघोलीकर यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेवर नवीन अध्यक्षपदावर त्यांची निवड करण्यात आली आहे.





चंद्रगुप्त माणिकलाल शाह वाघोलीकर यांचा अनेकांत एज्युकेशन सोसायटीशी अत्यंत जवळचा आणि जिव्हाळ्याचा संबंध आहे,ते गेल्या २० वर्षांपासून संस्थेच्या नियामक मंडळावर कार्यरत असून संस्थेच्या शैक्षणिक व संस्थात्मक वाटचालीत त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.विशेष म्हणजे त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण याच संस्थेच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात झाले आहे.त्यामुळे ज्या शैक्षणिक संस्थेच्या संस्कारात आणि शैक्षणिक वातावरणात त्यांची जडणघडण झाली,त्याच संस्थेच्या सर्वोच्चपदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे,ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे.

अनेकांत एज्युकेशन सोसायटीने गेल्या ६५ वर्षात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून, गुणवत्तापूर्ण शिक्षण,संशोधन,सामाजिक बांधिलकी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.संस्थेच्या या उज्ज्वल परंपरेला पुढे नेत आधुनिक शिक्षणपद्धती,संशोधन,नवीन उपक्रम आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या क्षेत्रात संस्थेला नवी उंची प्राप्त करून देण्याची जबाबदारी नवनिर्वाचित अध्यक्षांवर राहणार आहे. तसेच या सभेमध्ये नियामक मंडळाच्या सदस्य पदावर धवल अभयकुमार शाह यांची नियुक्ती करण्यात आली. या दोघांच्या निवडीबद्दल संस्थेचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, खजिनदार विकास शाह लेंगरेकर, नियामक मंडळाचे सर्व सदस्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप,अनेकांत कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.दर्शन शाह,अनेकांत इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक डॉ.धनंजय बागुल,अनेकांत इंग्लिश मीडियम च्या प्राचार्या श्रीमती प्रणाली वडेर तसेच संस्थेतील विविध शैक्षणिक विभागांचे पदाधिकारी व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

स्वर्गीय जवाहर शाह वाघोलीकर यांनी संस्थेच्या विकासासाठी दिलेले योगदान आणि निर्माण केलेला वारसा पुढे नेण्याची संधी नवनिर्वाचित अध्यक्षांना मिळाली आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली अनेकांत एज्युकेशन सोसायटी शैक्षणिक,सामाजिक आणि संस्थात्मक क्षेत्रात अधिक प्रगती साधेल,असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

इंदापूर तालुक्यातील रुग्णालयांत रुग्ण हक्क सनद लावण्याची मागणी

१५ दिवसांची मुदत; अन्यथा २ डिसेंबरला तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलनाचा इशारा

■ इंदापूर (दै. संध्या)

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे इंदापूर तालुकाप्रमुख सुधाकर बोराटे यांनी नागरिकांचे कर्तव्य या नात्याने इंदापूर उपजिल्हा रुग्णालयाच्या कार्यक्षेत्रातील तसेच तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्व खासगी रुग्णालयांमध्ये शासनमान्य सुधारित रुग्ण हक्क सनद (रुग्ण हक्क संहिता), उपचारांचे दरपत्रक, तक्रार निवारण अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक आणि रुग्णालयाचे नोंदणी प्रमाणपत्र दर्शनी भागात लावण्याची मागणी केली आहे.



याबाबत वैद्यकीय अधीक्षक डॉ. सिद्धार्थ नामपल्ले आणि प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ओंकार हेंद्रे यांना १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदन देण्यात आले. रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना त्यांचे हक्क, अधिकार, उपलब्ध सुविधा, उपचारांचे दर आणि तक्रार निवारणाची प्रक्रिया सहजपणे समजावी, यासाठी हे माहिती फलक लावणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

प्रत्येक रुग्णालयाने १५ दिवसांच्या आत रुग्ण हक्क सनद, आकारण्यात येणाऱ्या उपचारांचे दरपत्रक, तालुका व जिल्हास्तरीय तक्रार निवारण कक्ष अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक आणि वैद्य रुग्णालय नोंदणी प्रमाणपत्र दर्शनी भागात लावावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याच दिवशी सुधाकर बोराटे यांनी इंदापूर शहरातील डॉ. अभिजित ठोंबरे, डॉ. अविनाश पाणबुडे, डॉ. मनोज वाघमोडे, डॉ. अमोल रासकर, रोहन हेगडे, डॉ. सागर दोशी, डॉ. शिवाजीराव खबाले, डॉ. उदयसिंह फडतरे आणि डॉ. मनोजकुमार शिंदे यांच्या रुग्णालयांना प्रत्यक्ष भेट दिली. संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुग्ण हक्क सनद व इतर आवश्यक माहितीची प्रत देऊन सुधारित नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले.इंदापूर शहरातील उर्वरीत हॉस्पिटल यांनाही निवेदन दोन दिवसात देण्यात येणार असल्याची माहिती सुधाकर बोराटे यांनी दिली.

प्रशासनाने निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन १५ दिवसांत आवश्यक कार्यवाही व अंमलबजावणी करावी. अन्यथा २ डिसेंबर २०२६ रोजी इंदापूर तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सुधाकर बोराटे यांनी दिला आहे. रुग्णांना त्यांच्या हक्कांची माहिती मिळावी आणि रुग्णालयीन सेवांमध्ये पारदर्शकता निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

शिरूर न्यायालयातील ७६ कर्मचारी बेमुदत संपावर; कामकाज ठप्प

■ शिरूर (दै. संध्या)



मा. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे जिल्हा व तालुका न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही'समान काम-समान वेतन'लागू करावे, या न्याय्य मागणीसाठी राज्यभरातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आजपासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. या राज्यव्यापी संपात घोडनदी-शिरूर येथील न्यायालयातील एकूण ७६ कर्मचारी सहभागी झाले असून, आजपासून त्यांनी बेमुदत संप सुरू केला आहे. मा. उच्च न्यायालयाने या वेतनवाढीच्या प्रस्तावाला यापूर्वीच मंजुरी दिली आहे. मात्र, हा प्रस्ताव मागील २२ महिन्यांपासून महाराष्ट्र शासनाच्या दरबारी प्रलंबित आहे. शासनाच्या या दिरंगाई विरोधात संपूर्ण महाराष्ट्रातील विविध न्यायालयांमधील ३४,००० कर्मचारी आजपासून संपावर उतरले आहेत. शिरूर येथील मा. सत्र न्यायालय, मा. दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) आणि मा. सह-दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) यांच्या आस्थापनेवरील सर्व ७६ कर्मचाऱ्यांनी आजपासून कामावर बहिष्कार टाकून बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे न्यायालयीन दैनंदिन कामकाजावर मोठा परिणाम झाला आहे. जोपर्यंत शासन २२ महिन्यांपासून प्रलंबित असलेला वेतनवाढीचा प्रस्ताव मान्य करत नाही, तोपर्यंत हे बेमुदत कामबंद आंदोलन सुरूच राहील, असा ठाम निर्धार आंदोलक कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. या आंदोलनात शिरूर न्यायालयातील लघुलेखक एस. एन. पाटील, लिपिक जी. एस. जोशी, मुख्य बेलिफ एस. डी. मोडक, शिपाई जे. डी. वाघमोडे यांच्यासह सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी सुहास नेवासकर यांनीही सक्रिय सहभाग घेतला आहे.

कार्तिकी यात्रेसाठी १,००० मोबाईल टॉयलेट; १८० सीसीटीव्ही कॅमेरे

३० नोव्हेंबरपर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांचे निर्देश

■ आळंदी (दै. संध्या)

श्रीक्षेत्र आळंदी येथे होणाऱ्या कार्तिकी यात्रा संजीवन समाधी सोहळा २०२६ च्या नियोजनाला वेग आला आहे. यात्रेसाठी सुमारे एक हजार मोबाईल टॉयलेट, ४०० अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी, १८० सीसीटीव्ही कॅमेरे आणि ७०० सीटीपीटी सीट्सची व्यवस्था करण्यात येणार आहे. यात्रेपूर्वी सर्व विभागांनी आपापली कामे ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावीत, असे निर्देश खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी दिले. कार्तिकी यात्रेच्या पूर्वनियोजनासाठी आळंदी नगरपरिषदेच्या सभागृहात मंगळवारी (ता. १७) दौंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीचे विश्वस्त, पोलीस अधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी, यात्रा नियोजन समितीचे सभापती, नगरसेवक तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यात्राकाळात भाविकांच्या सुरक्षिततेसाठी शहरातील प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, ४०० बॅरिकेड्स, वॉच टॉवर आणि चोवीस तास पोलीस पेट्रोलिंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. आरोग्य सुविधांसाठी दहा वैद्यकीय बूथ, रुग्णवाहिका, ऑक्सिजन बेड आणि औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध केला जाणार आहे. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी चार ठिकाणी पाणी भरणा केंद्रे उभारण्यात येणार आहेत. वडगाव, चाकण, मरकळ व चऱ्होली रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, वाहनतळांची व्यवस्था, अतिक्रमण निर्मूलन, वाहतूक वळविणे, दर्शनबारीची व्यवस्था आणि इंद्रायणी नदीचे प्रदूषण रोखण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. महिला भाविकांसाठी हिरकणी कक्षात पाच हजार सॅनिटरी पॅड उपलब्ध करून देण्याचेही नियोजन आहे. यात्रेचे नियोजन करताना मागील वर्षांचे अनुभव लक्षात घेऊन सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे. प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी एनडीआरएफ पथके व अतिरिक्त अग्निशमन वाहने उपलब्ध ठेवावीत, असे निर्देश दौंडे यांनी दिले.



RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

जयस्तंभ शौर्यदिन कार्यक्रमाचा प्रशासनाकडून आढावा

विभागनिहाय जबाबदाऱ्यांचे सूक्ष्म नियोजन करून कामे वेळेत पूर्ण करा-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

■ पुणे (दै. संध्या)

ऐतिहासिक जयस्तंभ अभिवादन सोहळा अर्थात शौर्यदिन १ जानेवारी २०२७ रोजी साजरा होणार आहे. या सोहळ्यासाठी देशभरातून येणाऱ्या अनुयायांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने पूर्वतयारी सुरू केली असून, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज आढावा बैठकीत विविध विभागांच्या तयारीचा आढावा घेतला.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पोलीस उपायुक्त अविनाशकुमार, बार्टीच्या निबंधक डॉ. सुचिता शिंदे, विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे, प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे उपस्थित होते. शौर्यदिनाचा कार्यक्रम सुरळीत, सुरक्षित आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे. प्रत्येक विभागाला सोपविण्यात आलेली जबाबदारी निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावी. आवश्यक कामांच्या निविदा प्रक्रिया नियमानुसार विहित कालमर्यादेत पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले.

बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग, आरोग्य विभाग आणि अन्य संबंधित विभागांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभागाने अनुयायांसाठी सुसज्ज पार्किंग व्यवस्था निर्माण करावी. विद्युत विभागाने अखंडित वीजपुरवठा आणि आवश्यक प्रकाशव्यवस्थेचे नियोजन करावे.

पीएमपीएमएलने मागील वर्षाप्रमाणे यंदाही अनुयायांच्या वाहतुकीसाठी पुरेशा बसगाड्यांची व्यवस्था करावी. तसेच आरोग्य सुविधा, वैद्यकीय पथके, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी आणि परिसरातील स्वच्छता याबाबतही काटेकोर नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. कार्यक्रमासाठी येणाऱ्या अनुयायांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची सर्व विभागांनी दक्षता घ्यावी. नियोजनातील कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी विभागप्रमुखांनी नियमित समन्वय ठेवावा. कामांच्या अंमलबजावणीत कोणताही विलंब होणार नाही, याची जबाबदारी संबंधित विभागांनी घ्यावी, असेही जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी स्पष्ट केले. यावेळी पोलीस विभागाचे अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्हा परिषदेसह विविध विभागांनी शौर्यदिनाच्या अनुषंगाने केलेल्या नियोजनाची माहिती सादर केली. यावेळी विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

दुष्काळसदृश परिस्थितीत कृषी यांत्रिकीकरणाचा शेतकऱ्यांना आधार

■ पुणे (दै. संध्या)

■ जिल्ह्यातील ५ हजार ७९५ शेतकऱ्यांना ६५.११ कोटींचे अनुदान; आधार संलग्न बँक खात्यांवर रक्कम जमा

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीचा वाढता खर्च, मजुरांची कमतरता आणि उपलब्ध साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर या पार्श्वभूमीवर कृषी यांत्रिकीकरण योजना शेतकऱ्यांसाठी आधार ठरत आहे. शेतीची कामे कमी वेळेत, कमी श्रमात आणि कमी खर्चात करण्यासाठी कृषी यंत्रसामग्री उपलब्ध करून देणाऱ्या या योजनेंतर्गत पुणे जिल्ह्यातील ५ हजार ७९५ शेतकऱ्यांना आतापर्यंत ६५ कोटी ११ लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. ही रक्कम थेट शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यांवर जमा करण्यात आली आहे. दुष्काळसदृश परिस्थितीत पिकांचे व्यवस्थापन, मशागत, पेरणी, फवारणी आणि काढणीची कामे वेळेत पूर्ण करणे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे असते. अशा वेळी आधुनिक कृषी यंत्रांचा वापर उपयुक्त ठरत असून, कृषी यांत्रिकीकरणामुळे श्रम, वेळ आणि उत्पादन खर्चात बचत होण्यास मदत होत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ८८९ शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, ३६४ शेतकऱ्यांना पॉवर टिलर, २ हजार ९०२ शेतकऱ्यांना कृषी यंत्र-अवजारे, ६०० शेतकऱ्यांना कृषी अवजारे बँक, १३ शेतकऱ्यांना किसान ड्रोन, तर २७ शेतकऱ्यांना कंबाईन हार्वेस्टरसाठी अनुदान देण्यात आले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



'रामायण' चित्रपटावर हिंदु जनजागृती समितीचा तीव्र आक्षेप !

पुणे : दैनिक संध्या

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'रामायण' चित्रपटातील काही दृश्यांमधून महर्षि वाल्मिकी लिखित रामायणातील मूळ कथेत 'लेखन स्वातंत्र्या'च्या नावाखाली जाणीवपूर्वक बदलण्यात आले आहेत. यामध्ये रावणाचे अवाजवी उदात्तीकरण, अनेक प्रसंगात विपर्यास, लक्ष्मणाचे अवमूल्यन आणि प्रभु श्रीराम-लक्ष्मण यांच्या पराक्रमाशी विसंगत चित्रण अशा अनेक गोष्टी अत्यंत संतापजनक व आक्षेपार्ह आहेत. 'रामायण' हा कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा विषय आहे. या चित्रपटात 'कम्युनिस्ट अजेंडा' राबवल्याचेही दिसून येते. त्यामुळे रामाऐवजी रावणाचे महिमामंडन होणार असेल, तसेच आमच्या धर्मग्रंथांतील संदर्भांची मोडतोड होणार असेल, तर आम्ही या चित्रपटाच्या येणाऱ्या दुसऱ्या भागाला कडाडून विरोध करू, असा इशार देत 'कम्युनिस्ट नॅरेटिव्ह पसरवणारा हा चित्रपट सनातनी हिंदूंनी पाहू नये', असे आवाहन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत केले. आज 'मुंबई मराठी पत्रकार संघा'त झालेल्या पत्रकार परिषदेला सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. अभय वर्तक आणि हिंदु जनजागृती समितीचे मुंबई प्रवक्ते श्री. सतीश कोचरेकर हेही उपस्थित होते. या वेळी सनातन संस्थेचे प्रवक्ते अभय वर्तक म्हणाले की, जे रामायणात आहे, तसेच चित्रण होणे अभिप्रेत आहे. मात्र अनेक प्रसंगांत मूळ रामायणातील प्रसंगांची मोडतोड केली आहे. हे स्वीकारार्ह नाही. आज देशात रामभक्त पंतप्रधान आणि रामाला आदर्श मानणारे सरकार असतांना अशा कलाकृतींच्या माध्यमातून इतिहासाची मोडतोड होत असेल, तर ते दुर्दैवी आहे. श्री. घनवट पुढे म्हणाले की, 'सेन्सॉर बोर्ड' हे हिंदु सोडून सर्व अन्य धर्मियांच्या भावनांची काळजी घेणारे असून हिंदूंच्या धार्मिक भावनांची त्यांना आजिबात किंमत नाही. 'सेन्सॉर बोर्डा'ने कोणत्याही धर्मग्रंथांवर आधारित चित्रपटांना प्रमाणपत्र देतांना त्याचा पुरेपूर अभ्यास करायला हवा, असेही घनवट यांनी सांगितले.

जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीची त्रैमासिक सभा २५ नोव्हेंबर रोजी

पुणे : दैनिक संध्या

जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीची त्रैमासिक सभा बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथील पाचव्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या सभेच्या अनुषंगाने भ्रष्टाचारासंदर्भातील तक्रारी अथवा अर्ज सादर करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी सभेच्या दिवशी निश्चित वेळेत उपस्थित राहून आपले अर्ज दाखल करावेत, असे नामदेव टिळेकर, सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

सिग्नेचर ग्लोबलच्या दुसऱ्या तिमाहीतील महसुलात १४८ टक्क्यांची वाढ



पुणे : दैनिक संध्या

भारतातील आघाडीच्या स्थावर मालमत्ता विकासकांपैकी एक असलेल्या सिग्नेचर ग्लोबलने (बीएसई: ५४३९९० | एनएसई: सिग्नेचर) आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीतील आर्थिक कामगिरी जाहीर केली आहे. कंपनीच्या महसुलात मागील वर्षाच्या याच तिमाहीच्या तुलनेत १४८ टक्क्यांची लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली असून, महसूल ३३० कोटी रुपयांवरून वाढून ८२० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत कंपनीला ५० कोटी रुपयांचा निव्वळ तोटा झाला होता. मात्र, यंदाच्या दुसऱ्या तिमाहीत कंपनीने ७० कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीत कंपनीची आगाऊ विक्री १,८३० कोटी रुपये इतकी झाली. तर कंपनीच्या वसुलीमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ९ टक्क्यांची वाढ होऊन ती ९३० कोटी रुपयांवरून १,०१० कोटी रुपयांवर पोहोचली. ही कामगिरी बाजारातील स्थिर मागणी आणि प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीचे द्योतक आहे. नवीन प्रकल्पांचे नियोजनबद्ध सादरीकरण, शिस्तबद्ध वितरण आणि विविध प्रकारच्या प्रकल्पांच्या माध्यमातून ही वाढ कायम ठेवण्यावर कंपनीचा भर आहे. कंपनीच्या कामगिरीवर भाष्य करताना सिग्नेचर ग्लोबलचे अध्यक्ष आणि पूर्णवेळ संचालक श्री. प्रदीप कुमार अग्रवाल म्हणाले, "चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीतील आमची कामगिरी ही आमच्या व्यवसाय प्रारूपाची ताकद आणि सिग्नेचर ग्लोबल या ब्रँडवर घरखरेदीदारांनी दाखवलेल्या विश्वासाचे प्रतिबिंब आहे. गुरुग्राममध्ये दर्जेदार घरांची मागणी सातत्याने कायम आहे. आमच्या नियोजनबद्ध प्रकल्प सादरीकरणाला, विशेषतः प्रीमियम टोनिनो लॅम्बोर्गिनी रेसिडेन्सेस या प्रकल्पाला बाजारातून अतिशय सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. कंपनीच्या सरासरी विक्री दरातही १२.३ टक्क्यांची वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीत हा दर प्रति चौरस फूट १७,१२२ रुपये इतका झाला, जो आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रति चौरस फूट १५,२५० रुपये होता. गुरुग्राममधील सेक्टर ७१, एसपीआर मार्गिकेवरील प्रीमियम 'टोनिनो लॅम्बोर्गिनी रेसिडेन्सेस' या प्रकल्पाच्या यशस्वी सादरीकरणामुळे ही वाढ साध्य झाली आहे.

ज्ञान सेतू उपक्रमांतर्गत पुणे जिल्ह्यातील ५१ विद्यार्थी जम्मू-काश्मीर, आसाम आणि अरुणाचल प्रदेशच्या शैक्षणिक दौऱ्यावर

■ पुणे (दै. संध्या)

ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक जाणिवा आणि अनुभवाधारित शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा परिषद, पुणे यांच्या वतीने 'माझे गाव ते माझा देश' या संकल्पनेतून ज्ञान सेतू विद्यार्थी आदान-प्रदान उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत परीक्षेद्वारे निवड झालेले पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ५१ गुणवंत विद्यार्थी आणि ९ शिक्षक जम्मू-काश्मीर, आसाम आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांच्या शैक्षणिक दौऱ्यासाठी आज १७ नोव्हेंबर रोजी रेल्वेने रवाना झाले. हे विद्यार्थी २० नोव्हेंबर रोजी पुण्यात परतणार आहेत.



देशातील भौगोलिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विविधतेचा प्रत्यक्ष अनुभव घेणे, विविध राज्यांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधणे आणि 'विविधतेत एकता' या राष्ट्रीय मूल्याची जाणीव निर्माण करणे, हा उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या दौऱ्यासाठी विद्यार्थ्यांचे नऊ गट करण्यात आले असून प्रत्येक गटासाठी यजमान शाळा निश्चित करण्यात आली आहे. जम्मू-काश्मीरमधील भद्रवाह आणि पुंछ, आसाममधील दिराक, काकीपठार आणि डिब्रूगड, तसेच अरुणाचल प्रदेशातील रोइंग आणि तेजू येथील शाळांमध्ये विद्यार्थी शैक्षणिक सहअध्ययनात सहभागी होणार आहेत.

प्रवासापूर्वी विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय पूर्वतयारी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सांस्कृतिक संवेदनशीलता, संवाद कौशल्ये, प्रादेशिक माहिती आणि शैक्षणिक दौऱ्यातील अपेक्षित अनुभव याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. दौऱ्यादरम्यान विद्यार्थी यजमान शाळांमधील वर्ग, सहशालेय उपक्रम आणि स्थानिक विद्यार्थ्यांशी संवाद यात सहभागी होतील. तसेच संबंधित प्रदेशाचा इतिहास, भूगोल, संस्कृती आणि जीवनशैलीचा परिचय करून देणारा अभ्यासदौराही आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून जम्मू-काश्मीर, आसाम आणि अरुणाचल प्रदेशातील विद्यार्थ्यांनाही पुणे जिल्ह्याच्या भेटीसाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. या भेटीत त्यांना पुण्यातील शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक वारसा आणि स्थानिक जीवनशैली अनुभवण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे विविध राज्यांतील विद्यार्थ्यांमध्ये मैत्री, परस्पर समज आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल. ज्ञान प्रबोधिनी, पुणे ही या उपक्रमाची अंमलबजावणी भागीदार संस्था असून, कार्यक्रमाचे नियोजन, विद्यार्थ्यांचे पूर्वतयारी मार्गदर्शन आणि यजमान शाळांशी समन्वय साधण्याची जबाबदारी संस्थेकडे आहे. शिक्षण केवळ पाठ्यपुस्तके आणि वर्गखोलीपुरते मर्यादित नसते. या उपक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना देशाची विविधता अनुभवता येईल, विविध संस्कृती समजून घेता येतील आणि अन्य राज्यांतील विद्यार्थ्यांशी मैत्री निर्माण करता येईल. हा अनुभव विद्यार्थ्यांचे विचारविश्व व्यापक करून त्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देईल, असे जिल्हा परिषद अध्यक्ष विरधवल जगदाळे यांनी सांगितले.

रखडलेल्या स्मारकाविरोधात १९ नोव्हेंबरपासून पुण्यात बेमुदत धरणे आंदोलन

■ पुणे (दै. संध्या)

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विजय स्तंभ भेटीच्या शताब्दी वर्षातही स्मारक कागदावरच असल्याने भीमानुयायांमध्ये तीव्र असंतोष.

■ राहुल डंबाळे आणि डॉ. सिद्धार्थ धेंडे यांचा प्रशासनाला निर्वाणीचा इशारा.

१८१८च्या ऐतिहासिक लढाईत अजोड शौर्य गाजवणाऱ्या शूरवीर महार योद्ध्यांच्या गौरवार्थ मौजे पेरणे (ता. हवेली, जि. पुणे) येथे उभारण्यात आलेल्या ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजय स्तंभाचे भव्य राष्ट्रीय स्मारक तात्काळ करावे, या मागणीसाठी येत्या १९ नोव्हेंबर २०२६ पासून पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा 'भीमा-कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन समन्वय समिती'चे अध्यक्ष राहुल डंबाळे आणि प्रमुख नेते डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी आज येथे केली. या संदर्भातील अधिकृत पत्र माननीय मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आणि पुणे जिल्हाधिकारी यांना पाठवण्यात आले आहे. पत्रकात नेत्यांनी म्हटले आहे की, या राष्ट्रीय स्मारकासाठी समित्यांच्या माध्यमातून सातत्याने तीव्र संघर्ष आणि पाठपुरावा करण्यात आला होता. याच आंदोलनांच्या रेट्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी २०२१ मध्ये सुमारे ९८ कोटी रुपयांचा बृहत् विकास आराखडा (DPR) मंजूर करून शासनाकडे पाठवला होता. तसेच, राज्य सरकारने २०२२ मध्ये या स्मारकासाठी तब्बल १०० कोटी रुपयांच्या निधीची अधिकृत तरतूद जाहीर केली होती. मात्र, सर्व प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळालेली असतानाही गेल्या ४-५ वर्षांत प्रत्यक्ष जमिनीवर स्मारकाचे कोणतेही काम सुरू झालेले नाही. शासनाच्या या उदासीन व संथ कारभारामुळे देश-विदेशातील कोट्यवधी भीमानुयायांमध्ये तीव्र नाराजी आणि असंतोष पसरला आहे. राहुल डंबाळे व डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी पुढे नमूद केले की, "१ जानेवारी १९२७ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भीमा कोरेगाव विजयस्तंभाला भेट देऊन शूरवीरांना अभिवादन केले होते. आगामी १ जानेवारी २०२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या ऐतिहासिक भेटीला १०० वर्षे (शताब्दी वर्ष) पूर्ण होत आहेत. या सुवर्ण क्षणाचे औचित्य साधून यंदाच्या शौर्य दिनी पेरणे गावात अभूतपूर्व आणि विक्रमी जनसागर दाखल होणार आहे."

"या शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर, येथे येणाऱ्या कोट्यवधी अनुयायांना स्मारकाचे काम प्रत्यक्ष सुरू झालेले दिसणे अपेक्षित आहे. जर १ जानेवारी २०२७ पूर्वी युद्धपातळीवर काम सुरू झाले नाही, तर शासकीय दिरंगाईमुळे संतप्त झालेल्या जनसागराचा तीव्र उद्रेक रस्त्यावर पाहायला मिळू शकतो. यामुळे निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला पूर्णपणे शासन आणि प्रशासनच जबाबदार असेल," असा स्पष्ट इशारा दोन्ही नेत्यांनी दिला आहे.

दुष्काळाच्या सावटात माणुसकीचा दिवा

दुर्गम प्रतिष्ठानचा उपक्रम ठरला आधार

■ पुणे (दै. संध्या)

स्वराज्याची पहिली राजधानी राजगड किल्ल्याच्या आसऱ्याला, भाटघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात डोंगरावर वसलेल्या देहण, जळकेवाडी, झानेरी, मुऱ्हा गावांना पुण्यातील दुर्गम प्रतिष्ठानच्या वतीने दिवाळी भेट सुपूर्द करण्यात आली. तीव्र दुष्काळाच्या सावटामध्ये माणुसकीचा दिवा म्हणून राबविण्यात आलेल्या हा उपक्रम आर्थिक, सामाजिकदृष्ट्या दुर्बल, वंचितांसाठी आधार ठरला आहे.



अति दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींची दिवाळी गोड व्हावी, शहरवासीयांप्रमाणे त्यांनाही हा दिपोत्सव उत्साहाने साजरा करता यावा, या उद्देशाने पुण्यातील 'दुर्गम प्रतिष्ठान' संस्थेच्या वतीने रविवारी (ता. १) संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार जाधव, कार्याध्यक्ष डॉ. प्रसाद खंडागळे यांच्या नेतृत्त्वाखाली हा उपक्रम साजरा करण्यात आला. गावातील ७५ कुटुंबांना साखर, तेल, पोहे, रवा, बेसनपीठ, गव्हाचे पीठ, तूप, कडधान्य, डाळी, साबण, चहा पावडर, मसाले आदी महिनाभर पुरेल अशा किराणा मालासह दिवाळी फराळ, ब्लँकेट, कानटोपी, आकाश कंदील, बिस्किटे, सुगंधी तेल, साबण, पणती, उटणे, रांगोळी आदी जीवनावश्यक १०० वस्तूंसह चारशे वह्या शालेय साहित्याचे वाटप करण्यात केले. यावेळी देण्यात आलेल्या सौर कंदिलामुळे या वाड्यांचा अंधार दुरू होण्यास मदत होणार आहे. गावातील १३६ महिलांना साड्या, १०९ मुलामुलींना, तसेच २०० ज्येष्ठ नागरिकांना नवीन कपडेही देण्यात आले. रविवारी (दि. १) सकाळी ७ वाजता दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष महेश सुर्यवंशी व बीडचे अतिरिक्त जिल्हाधिकारी संजीव जाधव यांच्या शुभहस्ते दिवाळी साहित्याचे पूजन करून गाड्या रवाना झाल्या. गावात पोचताच गावकऱ्यांनी पारंपरिक वाद्यांच्या निनादात मिरवणुक काढून सर्वांचे स्वागत केले. पुणेकरांच्या स्वागतासाठी पानाफुलांच्या मदतीने स्वागत कमान उभारली. गावात पोचताच सर्वांचे औक्षण करण्यात आले. छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे कोषाध्यक्ष सुनील रासने यांच्या हस्ते करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर गावतील आजी-आजोबा, जेष्ठ नागरिकांचे औक्षण करण्यात आले. 'दुर्गम प्रतिष्ठान' संस्थेचे स्वाती सेठ, श्रीकांत मोरे, रविंद्र पठारे, ॲड. प्रमोद पवार, सुनंदा मोरे, स्वाती वाडेकर, निलेश जांभळे, गणेश काळे, अमोल कुटे, संजय ऐलवाड, सुनिल जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमासाठी रवि जाधव, श्रीप्रसाद गिरी, राजूशेठ गिरे, नितीन शहा, राहूल जाधव, संतोष कस्पटे, ॲड. शिवराज कदम, मनोज दंतकाळे, सचिन झेंडे, सुरेश मांदळे, विनायक अवसरे, वाल्मिक ढोरकुले, अमोल मुंडे, अनिल शिंदे, सिद्धेश जाधव, मनोहक कोंडाळकर, त्याच बरोबर महिला प्रतिनिधी रश्मी जाधव, करूणा कदम, रुपाली पटवर्धन, नीलम खंडागळे, लता कोंढाळकर, कल्याणी कदम, श्रृती जाधव, समृद्धी सेठ, सलोनी सेठ, खुशी गवळे, साक्षी शेळके त्यांच्यासह आधार ग्रुप, मेडिवन मेडिकल्स, दशानेमा भगवती मंडळ या संस्थांनी विशेष सहकार्य केले.

अध्यक्ष शशिकांत कांबळे यांना संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेसाठी निमंत्रण

बँकॉक, कतार, केनिया आणि सिंगापूरनंतर आता जिनिव्हात भारताचे प्रतिनिधित्व; मानवाधिकार आणि पर्यावरण विषयावर मांडणार विचार

■ पुणे (दै. संध्या)

स्वान फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि भारती विद्यापीठाचे माजी जनसंपर्क अधिकारी शशिकांत कांबळे यांना स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे आयोजित करण्यात येणाऱ्या १५ व्या संयुक्त राष्ट्र व्यवसाय आणि मानवाधिकार मंचासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. येत्या २३ ते २५ नोव्हेंबरदरम्यान जिनिव्हा येथील पॅलेस डेस नेशन्समध्ये ही परिषद होणार असून, या जागतिक व्यासपीठावर कांबळे भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. कांबळे यांना यापूर्वीही संयुक्त राष्ट्रांच्या विविध परिषदांसाठी निमंत्रित करण्यात आले होते. बँकॉक, कतार, केनिया आणि सिंगापूर येथे झालेल्या परिषदांमध्ये त्यांनी भारत आणि महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. आता जिनिव्हा येथील परिषदेसाठी मिळालेले निमंत्रण त्यांच्या आंतरराष्ट्रीय कार्याचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. कांबळे यांनी भारती विद्यापीठात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करताना विद्यापीठ, विद्यार्थी, शिक्षक आणि समाज यांच्यात समन्वय साधण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यानंतर त्यांनी स्वान फाऊंडेशनची स्थापना करून शिक्षण, संस्कृती आणि नेतृत्व विकासाच्या क्षेत्रात विविध उपक्रम राबविले. ज्ञानेश्वरीला ७५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने स्वान फाऊंडेशनच्या माध्यमातून मॉरिशसमध्ये 'मोगरा फुलला' हा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने झालेल्या या कार्यक्रमातून महाराष्ट्राची संतपरंपरा आणि ज्ञानेश्वरीतील विचार आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.



'भारती विद्यापीठात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करताना संवादाचे महत्त्व शिकलो. बँकॉक, कतार आणि सिंगापूर येथे भारताचे प्रतिनिधित्व केले. मॉरिशसमध्ये 'मोगरा फुलला' या कार्यक्रमातून ज्ञानेश्वरीचा विचार जगभर पोहोचविण्याचा प्रयत्न केला. नॉलेज नेस्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नासापर्यंत घेऊन जाण्याचे स्वप्न साकार केले. आता जिनिव्हामध्ये भारताचा आणि शिक्षकांचा आवाज जागतिक व्यासपीठावर मांडण्याची संधी मिळत आहे. हे निमंत्रण माझे एकट्याचे नसून महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यार्थ्याचे आहे,' अशी भावना शशिकांत कांबळे यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी कांबळे यांनी सुरू केलेला 'नॉलेज नेस्ट' हा उपक्रमही विशेष लक्षवेधी ठरला आहे. इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या या परीक्षेतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना अमेरिकेतील नासा (NASA), अलाबामा आणि सिंगापूर येथे शैक्षणिक भेटीची संधी उपलब्ध करून देण्यात आली. सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही जागतिक स्तरावरील शैक्षणिक अनुभव मिळावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

जिनिव्हा येथे होणाऱ्या परिषदेत कांबळे हे 'मानवाधिकार आणि पर्यावरण' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. त्याचबरोबर शाश्वत विकास उद्दिष्टांमधील उत्तम आरोग्य व कल्याण, सन्मानजनक रोजगार व आर्थिक विकास, उद्योग-नवोन्मेष व पायाभूत सुविधा आणि उद्दिष्टपूर्तीसाठी जागतिक भागीदारी या विषयांवर आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त कार्यालयाच्या (OHCHR) वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या मंचात जगभरातील सरकारे, उद्योग क्षेत्र, नागरी समाज, समुदाय संघटना, कामगार संघटना, गुंतवणूकदार, कायदेतज्ज्ञ, शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधी आणि प्रसारमाध्यमांचा सहभाग असणार आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

पिंपरी-चिंचवडमधील आशा स्वयंसेविका-गट प्रवर्तकांना "दिवाळी गिफ्ट"

■ भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेनंतर प्रशासनाची कार्यवाही

■ पात्र आशा स्वयंसेविका गटप्रवर्तकांना ७ ते १५ हजार रुपये मिळणार!

पिंपरी-चिंचवड : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना दिवाळीनिमित्त ७ हजार ते १५ हजार रुपयांचा प्रोत्साहनपर भत्ता देण्यास महापालिकेने मंजुरी दिली आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी याबाबत दि. २७ ऑक्टोबर रोजी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना पत्र देऊन भत्ता मंजूर करण्याची मागणी केली होती. त्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी महापालिकेचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला. त्यामुळे आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. माता-बाल आरोग्य, लसीकरण, विविध आजारांचे सर्वेक्षण आणि शासकीय आरोग्य योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचविण्यात आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक महत्त्वाची भूमिका बजावतात. विशेषतः झोपडपट्ट्या आणि वंचित वस्त्यांमध्ये आरोग्य यंत्रणा व नागरिक यांच्यातील दुवा म्हणून त्या काम करतात. त्यांच्या कामाची व्याप्ती आणि वाढती महागाई लक्षात घेऊन दिवाळी भत्त्याबाबत प्राधान्याने निर्णय घ्यावा, असे लांडगे यांनी पत्रात नमूद केले होते. पात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम करणे, आवश्यक आर्थिक तरतूद व प्रशासकीय मान्यता घेणे आणि भत्त्याची रक्कम दिवाळीपूर्वी थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करणे, यासाठी वैद्यकीय व लेखा विभागांना निर्देश द्यावेत, अशी मागणीही लांडगे यांनी केली होती. मागील वर्षी मंजूर भत्त्यापैकी कोणाची रक्कम प्रलंबित असल्यास पडताळणी करून ती तातडीने अदा करावी, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली होती. मागील वर्षी पात्र आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांसाठी ३ हजार ते १० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर भत्ता मंजूर करण्यात आला होता. यंदा किमान भत्ता ४ हजार रुपयांनी, तर कमाल भत्ता ५ हजार रुपयांनी वाढविण्यात आला आहे. सप्टेंबर २०२५ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत किमान सहा महिने (१८० दिवस) काम केलेल्या आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना विहित अटींनुसार हा लाभ मिळणार आहे. महापालिकेच्या ठरावानुसार, २०२५-२६ मध्ये ७५१ आशा स्वयंसेविका कार्यरत होत्या. भत्त्याचा खर्च वैद्यकीय विभागाच्या कुटुंब कल्याणअंतर्गत 'बोनस तथा सानुग्रह अनुदान' या लेखाशिर्षातून करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

"लसीकरणापासून माता-बाल आरोग्यापर्यंत अनेक सेवा घरोघरी पोहोचवण्याचे काम आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक करतात. त्यांच्या कामाची दखल घेऊन दिवाळीनिमित्त प्रोत्साहनपर भत्ता द्यावा, अशी मागणी मी महापालिका आयुक्तांकडे केली होती. पात्र स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना ७ ते १५ हजार रुपयांचा भत्ता देण्याच्या निर्णयाचे स्वागत करतो. मंजूर रक्कम त्यांच्या बँक खात्यात लवकर जमा व्हावी, यासाठी पाठपुरावा करणार आहे."

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

आमचे वाचक बोलतात...!

संतापजनक प्रकार !!

महाराष्ट्रातील लाखो प्रवासाचे मुख्य साधन हे लालपरी अर्थात एसटी आहे. 'प्रवाशांच्या सेवेसाठी' आणि 'सुरक्षित प्रवास' असं ब्रीदवाक्य असलेल्या या महामंडळाने मात्र याच्याच एकदम उलट काम केलं आहे. भंडाऱ्यातील रोह्यात एसटी बसशी संबंधित एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. भंडारा ते मुंढरी असा प्रवास करणाऱ्या दोन विद्यार्थिनींना एसटी बसमधून अर्ध्या वाटेतच अंधारात बसमधून उतरवल्याचा प्रकार घडला आहे. चालक आणि वाहक यांचे हे कृत्य चीड आणणारे असून महामंडळाने त्या दोघांवर कठोर कारवाई करावी. एसटीतील अनेक चालक- वाहक है प्रवाशांसी सौजन्याने वागतच नाही.

वाचकपत्रे पाठविण्यासाठी : news.sandhya@gmail.com

दुष्काळी भागातील एकही पात्र कुटुंब रोजगारापासून वंचित राहू नये

रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले

जलसंधारण, चारा उपलब्धता आणि ग्रामीण पायाभूत कामांना प्राधान्य देण्याचे आदेश

'व्हीबी जी राम जी' अंतर्गत कामे आणि प्रलंबित देयकांचा आढावा

■ मुंबई (दै. संध्या)



दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन रोजगार हमी योजना आणि 'व्हीबी जी राम जी' अंतर्गत कामांची सर्व स्तरांवर प्रभावी अंमलबजावणी करावी. ग्रामीण भागातील रोजगाराची मागणी करणारे एकही पात्र कुटुंब रोजगारापासून वंचित राहू नये. रोजगार निर्मितीबरोबरच जलसंधारण, चारा उपलब्धता आणि ग्रामीण पायाभूत सुविधांच्या निर्मितीला प्राधान्य द्यावे, असे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'व्हीबी जी राम जी'अंतर्गत घ्यावयाची कामे आणि प्रलंबित देयके यांचा रोहयो मंत्री गोगावले यांनी दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत आढावा घेतला. दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण जनतेला दिलासा देणे, शेतकऱ्यांना आधार देणे आणि प्रत्येक गरजू कुटुंबाला रोजगार उपलब्ध करून देणे, हे विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. या कामातील जबाबदारी कोणत्याही स्तरावरील अधिकाऱ्याने टाळू नये, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्य शासनाने ११६ कोटी रुपयांचा पूरक कुशल निधी उपलब्ध करून दिला आहे. हा निधी केवळ शासनमान्य आणि निधी वितरण पत्रात नमूद केलेल्या कामांवरच खर्च करावा. पाणंद रस्त्यांच्या ज्या कामांना पूरक कुशल निधीची मान्यता दिली आहे, त्यांचीच देयके अदा करावीत. निधीच्या वापरात कोणतीही अनियमितता किंवा दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असे मंत्री गोगावले यांनी स्पष्ट केले. उपलब्ध निधी योग्य कामांसाठी, योग्य लाभार्थ्यांपर्यंत आणि वेळेत पोहोचविण्याची जिल्हा प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

चाऱ्याची सर्वाधिक टंचाई असलेल्या जिल्ह्यांचे तातडीने मूल्यांकन करून प्राधान्यक्रमानुसार यादी तयार करावी. कोकणात उपलब्ध गवताची कापणी सुरू करण्यात आली असून, नव्याने चारा उपलब्ध होईपर्यंत टंचाईग्रस्त जिल्ह्यांना तेथून शक्य तितका चारा पाठविण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे मंत्री गोगावले यांनी सांगितले.

'व्हीबी जी राम जी'अंतर्गत ७६ कोटी रुपयांचे निधी हस्तांतरण आदेश प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३८ कोटी रुपयांची प्रक्रिया पूर्ण करून संबंधित लाभार्थी तसेच अंमलबजावणी यंत्रणा असलेल्या ग्रामपंचायतींच्या खात्यांत रक्कम वर्ग करण्यात आली आहे. उर्वरित ३८ कोटी रुपयांचे प्रमाणीकरण पूर्ण करून येत्या शुक्रवारपर्यंत वितरण करण्याची कार्यवाही विभागाने करावी, असे मंत्री गोगावले यांनी सांगितले. अकुशल कामांची मजुरी मस्टर बंद झाल्यानंतर उशिरात उशिरा सहा दिवसांच्या आत कामगारांच्या खात्यात जमा होईल, याची दक्षता घ्यावी. राज्यातील सर्व प्रलंबित प्रकरणांची जिल्हानिहाय कारणे तपासून तातडीने कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी दिले. रोजगार सेवकांच्या मानधनासाठी निधी उपलब्ध करून दिल्यानंतरही ग्रामपातळीवरील अडचणींमुळे मानधन प्रलंबित राहू नये, असेही मंत्री गोगावले यांनी सांगितले.

विभागाचे सचिव अप्पासो धुळाज यांनी यावेळी जिल्हानिहाय आढावा घेऊन मजुरांचे स्थलांतर होणार नाही याची दक्षता घ्यावी, शासनाने मान्यता दिलेला आणि कमी पाण्यावर येणारा चारा लागवड करावी, ज्या जिल्ह्यांना मनुष्यबळ पुरविण्यात आले आहे त्यांनी त्यांना रोजगार हमीअंतर्गत रुजू करून घ्यावे, असे निर्देश दिले. या बैठकीस सहसचिव अतुल कोदे, कैलास साळुंके, आयुक्त अनिता मेश्राम यांच्यासह विभागाचे राज्यातील अधिकारी उपस्थित होते.

मीशो आणि यूट्यूब शॉपिंगची भागीदारी

■ बेंगळुरू (दै. संध्या)

■ देशभरातील कंटेंट क्रिएटर्सना कमाईच्या नव्या संधी मिळणार

मीशोने यूट्यूब शॉपिंगसोबत भागीदारीची घोषणा केली आहे. देशभरातील कंटेंट क्रिएटर्सना कमाईच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे हा या भागीदारीचा उद्देश आहे. या भागीदारीअंतर्गत पात्र यूट्यूब क्रिएटर्स त्यांच्या व्हिडिओ, शॉर्ट्स आणि लाइव्ह स्ट्रीममध्ये थेट मीशोची उत्पादने टॅग करू शकतील. यूट्यूबच्या निश्चित अटी पूर्ण करणारे आणि किमान 500 सबस्क्राइबर्स असलेले क्रिएटर्सदेखील या कार्यक्रमात सहभागी होऊ शकतील. क्रिएटर्सच्या व्हिडिओद्वारे उत्पादनांची खरेदी झाल्यास त्यांना कमिशन मिळेल. त्यामुळे ते त्यांच्या प्रेक्षकांना उत्पादनांची माहिती देण्यासोबतच कमाईदेखील करू शकतील. या भागीदारीद्वारे कंटेंट क्रिएटर्सना मीशोवर 40 श्रेणींमध्ये उपलब्ध असलेल्या 3 कोटींहून अधिक उत्पादनांची जाहिरात करण्याची संधी मिळेल. ही उत्पादने 2 लाखांहून अधिक विक्रेत्यांकडून उपलब्ध करून दिली जातात. फॅशन, ब्युटी, घराची सजावट आणि स्वयंपाकघरातील वस्तू यांसारखी विविध उत्पादने क्रिएटर्स त्यांच्या रिव्ह्यू व्हिडिओ, स्टायलिंग व्हिडिओ, शॉपिंग व्हिडिओ आणि लाइव्ह स्ट्रीममध्ये दाखवू शकतील. यामुळे प्रेक्षकांना त्यांच्या आवडीच्या उत्पादनांची माहिती मिळेल आणि ते काही क्लिकमध्ये मीशोवरून खरेदीदेखील करू शकतील. यूट्यूबवर एखाद्या उत्पादनाशी संबंधित व्हिडिओ अपलोड झाल्यानंतर बराच काळ लोटला तरी लोक तो शोधून पाहू शकतात. त्यामुळे क्रिएटर्सना त्यांच्या जुन्या व्हिडिओंच्या माध्यमातूनही कमिशन मिळवण्याची संधी मिळू शकते. या भागीदारीमुळे मीशो क्रिएटर क्लबच्या विद्यमान सदस्यांनाही यूट्यूबवर त्यांच्या उत्पादनांची जाहिरात करण्याची आणि नव्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळेल. ते विविध प्रकारचे व्हिडिओ तयार करून अधिक लोकांशी जोडले जाऊ शकतील आणि त्यांची कमाई वाढवू शकतील. या भागीदारीबाबत मीशोच्या जनरल मॅनेजर, कंटेंट कॉमर्स, निकिता दावडा म्हणाल्या, "यूट्यूब शॉपिंगसोबतची ही भागीदारी कंटेंट क्रिएटर्ससाठी एक मोठी संधी आहे. यामुळे यूट्यूबची व्यापक पोहोच आणि मीशोवर परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध असलेली उत्पादने एकत्र येतील. क्रिएटर्सना त्यांची पोहोच वाढवण्याच्या आणि त्याद्वारे कमाई करण्याच्या अधिक संधी मिळतील. त्याचबरोबर मीशोचे विक्रेतेही नव्या ग्राहकांपर्यंत पोहोचू शकतील आणि ग्राहकांसाठी उत्पादने शोधणे व खरेदी करणे आणखी सोपे होईल.

सुरकुंडीत गरजू कुटुंबांना नगरसेवक सचिन तापकीर यांचा मदतीचा हात

आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप



■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

चऱ्होली येथील भाजपचे नगरसेवक सचिन तापकीर यांनी सहकाऱ्यांसह खेड तालुक्यातील सुरकुंडी गावाला भेट देऊन गरजू कुटुंबांना धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप केले. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमांतर्गत तापकीर यांनी पुढाकार घेऊन ही मदत गावातील कुटुंबांपर्यंत पोहोचवली.

या वेळी सुरकुंडीचे सरपंच शशिकांत वाजे, उपसरपंच सुनील सुपे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ सरोदे, सामाजिक कार्यकर्ते बाळू घिगे, संकेत वाजे आणि भीमा जाधव, तसेच मारुती भोकटे, सोमनाथ सावंत, योगेश केदारी, विठ्ठल वाजे आणि वाजेवस्तीतील ग्रामस्थ उपस्थित होते. भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि प्रदेश महामंत्री राजेश पांडे यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाला. 'एक नगरसेवक, एक गाव' या संकल्पनेतून खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांतील ५१ आदिवासी गावांमधील गरजू कुटुंबांना महिनाभर पुरेल असे किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्याचे नियोजन आहे. नगरसेवक सचिन तापकीर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी खेड तालुक्यातील मौजे माजगाव येथेही भेट दिली. तेथील गरजू कुटुंबांना धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप केले. वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून गरजू कुटुंबांना आधार देण्याचा संकल्प या मदतकार्यातून माजगावातही कृतीत उतरला.

"आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून गरजू कुटुंबांना आधार देण्याचा आम्ही संकल्प केला. त्यातूनच सहकाऱ्यांसह सुरकुंडी आणि माजगाव येथे जाऊन धान्य, किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंचे किट दिले. या मदतीमुळे कुटुंबांना दैनंदिन खर्चात काहीसा दिलासा मिळेल, अशी आशा आहे."

- सचिन तापकीर, नगरसेवक, भाजपा, चऱ्होली.



समाज विकासात अभियंत्यांची भूमिका महत्त्वाची

नवलकिशोर राम आयुक्त पुणे मनपा

■ पुणे (दै. संध्या)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स (बानाई) महाराष्ट्र राज्य यांचे वतीने आयोजित राज्यस्तरीय अभियंता संमेलनात उदघाटक म्हणून बोलताना नवल किशोर राम, आयुक्त पुणे मनपा यांनी चांगले अभियंते ही समाजाची संपत्ती असून विकास कामातील तंत्रज्ञानाबरोबरच अभियंत्यांनी समाजाच्या विकास कामात देखील महत्वपूर्ण भूमिका निभवावी, जेणे करून उपेक्षित समाजाला मदतीचा हात मिळेल असे मत व्यक्त केले. शिवाजीनगर, पुणे येथील इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्सच्या सभागृहात हा कार्यक्रम नुकताच पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. धनराज तावडे माजी सदस्य, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण भारत सरकार, इंजि. भरतकुमार बावीस्कर, अधीक्षक अभियंता सा.बां. मंडळ, पुणे, इंजि. जी. एम. कंधारे, माजी सचिव स.बां. विभाग, महाराष्ट्र राज्य, इंजि. प्रदिप नगरारे, जेष्ठ अभियंता, नागपूर हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजि. कुलदीप रामटेके मा. अधीक्षक अभियंता जलसंपदा विभाग हे होते. या वर्षाच्या भीषण दुष्काळी परिस्थितीमध्ये पाण्याची सुरक्षा व पाण्याची काटकसर करण्यासाठी बानाई ही अभियंत्यांची संघटना समाजामध्ये पुढे राहून काम करेल अशी घोषणा कुलदीप रामटेके यांनी केली. दुपारच्या सत्रात राजीव नंदकर अतिरिक्त जिल्हाधिकारी व प्रसिध्द लेखक यांचे समाज विकासात अभियंत्यांची भूमिका या विषयावर प्रभावी व्याख्यान झाले. संमेलनास महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यातील सुमारे १५० अभियंत्यांनी उत्स्फूर्त हजेरी लावली. पांडुरंग शेलार, अध्यक्ष बानाई पुणे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात आपण स्वातंत्र्याचा व राज्यघटनेचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना संविधानानुसार शोषीत व वंचित घटकांना अपेक्षित लाभ व न्याय मिळण्यासाठी शासनाने कटिबध्द राहिले पाहिजे अशी आशा व्यक्त केली. महाराष्ट्र शासन सेवेतील सर्वच अधिकाऱ्यांना अनेक वर्षे रखडलेले पदोन्नतीमधील आरक्षण लागू करावे. शासनाने खाजगी क्षेत्रामध्ये आरक्षण लागू करावे तसेच मागासवर्गीयांमधील बेरोजगार अभियंत्यांना व व्यावसायिकांना शासकीय तसेच निमशासकीय क्षेत्रांमध्ये ५% आरक्षण ठेकेदारीमध्ये देण्यात यावे अशा प्रमुख मागण्या या संमेलनामध्ये करण्यात आल्या. आभार प्रदर्शन चंद्रशेखर जावळे यांनी केले.

पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष विद्युत विभाग

निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. १८/११/२०२६ ते दि. ०२/१२/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत

स्विकृती दिनांक : दि. १८/११/२०२६ ते दि. ०२/१२/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : ०३/१२/२०२६ १५.०० दुपारी

निविदा क्रमांक	खात्याचे नाव	कामाचे नाव	निविदा संच किंमत रू.	अंदाजित पुर्व गणित रक्कम रू.	बयाणा रक्कम रू.	कामाची मुदत (महिने)	निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक
PMC/ELECTRICAL/ 2026/294	विद्युत	भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी मेडीकल कॉलेजच्या हॉस्टेलसाठी टीचिंग स्टाफसाठी, हॉस्पिटलसाठी. मेडीकल कालेजसाठी वीजपुरवठा देण्यासाठी विद्युत विषयक कामे करणे.	रू. ६०७९/-	रु. १२२०६२५८/-	रु. १२२०६३/-	६	रोहन मुंतुंगे ९६८९९८९१६२

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.

क) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.

ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Abhay Vasant Dharmadhikari
कार्यकारी अभियंता
विद्युत
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/११४० दि. १७/११/२०२६

पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष

ई-निविदा जाहिरात - फेर निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक : दि. १८/११/२०२६ ते दि. २५/११/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत

स्विकृती दिनांक : दि. १८/११/२०२६ ते दि. २५/११/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २६/११/२०२६ ०३.०० दुपारी

अ. क्र.	निविदा क्रमांक	खात्याचे नाव	कामाचे नाव	निविदा संच किंमत रू.	अंदाजित पुर्व गणित रक्कम रू.	बयाणा रक्कम रू.	कामाची मुदत	निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक
1	PMC/ ELECTRICAL/ 2026/160	विद्युत विभाग	पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये जुने मुख्य सभागृह येथे नविन वातानुकूलित यंत्रणा पुरविणे, बसविणे व यशस्विरीत्या चालू करणे.	6079.00	5615854.00	56159.00	६ महिने	श्री. वैभव घुले 7447472413

निविदा संचाची विक्री www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरू राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. www.mahatenders.gov.in

सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल Support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
कार्यकारी अभियंता
(विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/११४८ दि. १७/११/२०२६

थोडक्यात पण महत्वाचे



सलग सुट्ट्या घेणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कडक कारवाई करा : वाघेरे

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांना दिवाळीची सलग पाच दिवस सुट्टी असताना सुट्टी संपल्यावरही सलग जोडून गुरुवार व शुक्रवार मनमानी पद्धतीने सुट्टी घेणाऱ्या बेजबाबदार, मस्तवाल आणि निढावलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कडक कारवाई करा, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश वाघेरे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ विजय सुर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेतील अधिकाऱ्यांना कर्मचारी यांना लाखोंच्यावर गलेलठ्ठ पगार आहे. बोनस लाखांच्या घरात आहे. त्यामुळे हे अधिकारी, कर्मचारी मस्तावाल झालेले आहेत. हे जनतेचे नोकर आहेत. हे विसरलेले आहेत. ही महापालिका करदात्यांच्या पैशावर चालते, हेही हे अधिकारी आणि कर्मचारी विसरलेले आहेत. त्यामुळे दिवाळीची सुट्टी संपल्यावर गुरुवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ आणि शुक्रवार १३ नोव्हेंबर २०२६ रोजी मनमानी पद्धतीने सुट्टी घेतलेल्या सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर बेजोबदारपणाचा ठपका ठेवून कडक कारवाई करा. दिवाळीच्या पाच दिवस सुट्टी संपल्यावर गुरुवार आणि शुक्रवारी आपल्या कामासाठी महापालिकेच्या मुख्य इमारती व प्रभाग कार्यालय, कर सकलन कार्यालयात आलेल्या नागरिकांना या बेजबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागला आहे. अशा बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर आयुक्त साहेब आपण कडक कारवाई करावी , जेणेकरुन हे अधिकारी आणि कर्मचारी पुढच्या वेळी असा प्रकार करणार नाहीत, असे निवेदनात नमूद केले आहे.



प्राधिकरण जेष्ठ नागरिक संघातर्फे गायन आणि हस्ताक्षर स्पर्धा संपन्न

प्राधिकरण : दैनिक संध्या

प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघातर्फे, दादादादी विरंगुळा केंद्रामध्ये संध्याकाळी ४ ते ७ हस्ताक्षर स्पर्धा तसेच गायन स्पर्धेचे आयोजन केले गेले . हस्ताक्षर स्पर्धेमध्ये ५५ व गायन स्पर्धेमध्ये ३४ असे एकूण ८९ सभासद सहभागी झाले. हस्ताक्षर स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांना शाळेतील परिक्षेची आठवण झाली. गायन स्पर्धेमध्ये, पहिली,दुसरी व तिसरी अशा तीन फेऱ्या झाल्या. उत्तेजनार्थ क्रमांक श्री.दिलीप गोसावी, व श्रीमती सुमन कुलकर्णी, तृतीय क्रमांक श्री. दत्तात्रय बरिदे, द्वितीय क्रमांक सौ.आशा नष्टे, व प्रथम क्रमांक श्रीमती रश्मी साटम यांनी पटकावला.स्पर्धेचे परीक्षण श्री. सचिन शिंगाडे तबला, हार्मोनियम व बासरीवादक विशारद तसेचं सौ.सुनिता करडे, संगीत विशारद यांनी केले. प्राधिकरण जेष्ठ नागरिक संघामध्ये पहिल्यांदाच काही तरी नवीन कल्पना राबवली, आणि त्याला उदंड यश लाभले. ऐन दिवाळीच्या सणात सांस्कृतिक समिती प्रमुख सौ. ज्योती कानेटकर आणि सांस्कृतिक समिती सह प्रमुख श्रीमती माधुरी ओक यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांचा उल्लेख संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर जोशी यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला , असेच काही वैविध्यपूर्ण उपक्रम भविष्यात हाती घेऊन यशस्वी करू शकतो याची खात्री पटली असेही त्यांनी नमूद केले.



विविध भारती म्युझिकल इव्हेंटचा तिसरा वर्धापन दिन संपन्न

पिंपरी : दैनिक संध्या

विविध भारती म्युझिकल इव्हेंट या संस्थेच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला 'छायागीत' हा नव्या जुन्या गाजलेल्या हिंदी मराठी गीतांचा विशेष कार्यक्रम रविवारी (१५ नोव्हेंबर) सांगवीतील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी माजी महापौर शकुंतला धराडे, 'ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या अध्यक्षा तृप्ती कांबळे, दिशा सोशल फाऊंडेशन अध्यक्ष बाळासाहेब जवळकर, उपाध्यक्ष संतोष बाबर, संचालक सचिन साठे, राजेश सावंत, महेंद्र चिंचवडे, साहित्यिक अनिल दीक्षित, कॉसमॉस बँकेचे संदीप क्षीरसागर, सामाजिक कार्यकर्ते नितीन यादव, शरद शेजवळ, राणू कदम, राजेंद्र देसाई, रवींद्र लांडगे, घमाजी लांडगे, प्रकाश कानडे, प्रकाश गायकवाड, गणेश पठारे, संदीप शिर्के, नरेंद्र मोहिते, उद्योजक रामदास यादव, सुरेश साठे, सुजाता सुतार, खंडू ववले आदी उपस्थित होते. विनायक कदम यांनी 'छायागीत'या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. संकल्पना नंदकुमार कांबळे यांची होती. या मैफलीत मीरा शिंदे, सुजाता माळवे, पूनम झांबरे, जहांगीर पठाण, सूर्यकांत ताम्हाणे, डॉ. कविता बोंडे, स्मिता गायकवाड, शैलेंद्र पाटील, स्वाती पाटील, डॉ. आरोही पाटे, नेहा गायकवाड, सतीश कापडी, शीलरतन बंगाळे, डॉ. संदीप गायकवाड, सुधाकर बाविस्कर, विजय सांबारे, राजू शिरसाट, दामोदर घनतोडे, डॉ. किशोर वराडे, राजेंद्र पगारे, अनिल जंगम, बळवंत कणसे, प्रतिभा ताटकर, छाया घुले पाटील, नंदकुमार कांबळे आणि विनायक कदम या गायक कलाकारांनी सादर केलेल्या एकल व युगल गीतांना रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. शास्त्रीय संगीतावर आधारित हिंदी गीतांसह दादा कोंडके, सुरेश वाडकर यांची लोकप्रिय गीते आणि डिस्कोच्या ठेक्यावरील उडत्या चालींच्या गाण्यांमुळे विशेष रंगत आली. नंदकुमार कांबळे यांनी प्रास्तविक तर सूत्रसंचालन संदीप साकोरे यांनी केले. संयोजनात आकाश गाजूल, सौमिल घावटे, शैलेश घावटे, छाया घुले पाटील, सचिन शेटे, अनिल जंगम यांनी सहभाग घेतला.

मेट्रोच्या सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी आमदार जगताप यांचा पुढाकार

हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो मार्गावर प्रवास: वाकड मेट्रो स्थानकाची पाहणी, प्रवासी, आयटीयन्स आणि नागरिकांशी साधला संवाद



■ पिंपरी(दै. संध्या)

हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो मार्गावर (वाकड चौक ते माण फेज ३) सोमवारी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी प्रवास केला . यावेळी त्यांनी प्रवासी, आयटी क्षेत्रातील कर्मचारी आणि नागरिकांशी संवाद साधण्यात आला. प्रवाशांच्या अडचणी, अपेक्षा आणि विविध मागण्या जाणून घेतल्या. तसेच वाकड मेट्रो स्टेशन परिसरातील कामाची पाहणी करून या मेट्रो मार्गाचा अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळावा, प्रवास सुलभ व्हावा आणि शहरातील वाहतूक कोंडी कमी व्हावी, यासंदर्भात नियोजन करावे अशा सूचना यावेळी मेट्रो तसेच पिंपरी चिंचवड महापालिका अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी सोमवारी (दि. १६) हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो मार्गावर (वाकड चौक ते माण फेज ३) प्रवास केला. यावेळी नागरिकांसह पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड (PITCMRL), पीएमपीएमएल, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या वतीने विविध मागण्या मांडण्यात आल्या. यावेळी आमदार जगताप म्हणाले, हिंजवडी मेट्रो हा खऱ्या अर्थाने 'आयटीयन्स'साठी मोठा दिलासा आहे. मोठ्या संख्येने आयटीयन्स या मेट्रोचा उपयोग करत आहेत. शिवाय शहरातील इतर कनेक्टिव्हिटीला या मेट्रोमुळे मोठा दिलासा मिळणार आहे. या मेट्रो सुविधेमुळे पुनावळे, ताथवडे, वाकड, मामुर्डी,किवळे, रावेत या भागात देखील वाहतुकीवरील ताण कमी होणार आहे

मागण्या पूर्ण करण्यासाठी पुढाकार

आमदार शंकर जगताप म्हणाले, हिंजवडी शिवाजीनगर मेट्रो मार्गादरम्यान असलेल्या स्थानकांजवळ बहुमजली स्वयंचलित पार्किंग व्यवस्था उभारणे, स्थानकांपासून सुमारे १० किलोमीटर परिसरात नियमित फीडर बस सेवा सुरू करणे, तसेच वाकड मेट्रो स्थानकाचे प्रमुख वाहतूक केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील . वाकड स्थानकाला पिंपरी, चिंचवड, पिंपळे सौदागर, सांगवी, निगडी, रावेत आणि आळंदी परिसरातील बससेवेशी जोडण्याची सूचनाही करण्यात आली. याशिवाय मेट्रो स्थानकांना निवासी व व्यावसायिक भागांशी जोडणारे सौरऊर्जायुक्त संरक्षित स्कायवॉक उभारणे, बस व मेट्रोचे मार्ग, वेळापत्रक, थेट लोकेशन आणि प्रवासखर्चाची माहिती देणारे एकात्मिक प्रवास नियोजन ॲप विकसित करणे, तसेच मेट्रो आणि फीडर बससाठी एकत्रित तिकीट व सवलतीचे पास उपलब्ध करून देणे. प्रवाशांच्या समस्या आणि सूचनांचा नियमित आढावा घेण्यासाठी मेट्रो–प्रवासी समन्वय समिती स्थापन करणे, तसेच पादचारी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग प्रवासी आणि सायकलस्वारांसाठी स्थानक परिसर अधिक सुरक्षित व सुलभ करण्यावर भर द्यावा अशी सूचना केलेली आहे. या सर्व सूचनांचा आणि मागण्यांचा संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा करून मेट्रो सेवा अधिक प्रभावी, प्रवासीस्नेही आणि सर्वसमावेशक करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

“

हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रो ही केवळ आयटीयन्ससाठीच नव्हे, तर पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाची सार्वजनिक वाहतूक सुविधा आहे. या मेट्रोचा अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळण्यासाठी स्थानकांपर्यंत पोहोचण्याची सुविधा, फीडर बस सेवा, पुरेशी पार्किंग व्यवस्था आणि इतर सार्वजनिक वाहतूक सेवांशी समन्वय असणे गरजेचे आहे. वाकड मेट्रो स्थानक हे प्रमुख वाहतूक केंद्र म्हणून विकसित झाल्यास पिंपरी-चिंचवडमधील अनेक भागांची कनेक्टिव्हिटी अधिक सुलभ होईल. यामुळे खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासही मदत होईल.

- शंकर जगताप, आमदार चिंचवड विधानसभा

आकुर्डीत कंटेनरच्या धडकेत डिलिव्हरी बॉयचा मृत्यू

■ पिंपरी (दै. संध्या)



भरधाव कंटेनरने मोटारसायकलला धडक दिल्याने झेप्टो कंपनीत डिलिव्हरीचे काम करणाऱ्या तरुणाचा मृत्यू झाला. अपघातानंतर जखमी तरुणाला मदत न करता कंटेनरचालकाने घटनास्थळावरून पळ काढला. ही घटना शनिवारी (दि. १४) रात्री साडेअकराच्या सुमारास आकुर्डी येथील बजाज ऑटो कंपनीसमोर ग्रेड सेपरेटर रस्त्यावर घडली. अंकित अशोक मगर असे मृत तरुणाचे नाव आहे.

याप्रकरणी त्याचे वडील अशोक उत्तम मगर (५५) यांनी निगडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, कंटेनरचालक प्रदीप उदेशराम कुमार (२८, मूळ रा. औरंगाबाद, बिहार) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंकित हा डिलिव्हरीचे काम करण्यासाठी मोटारसायकलवरून निगडीकडून पिंपरीच्या दिशेने जात होता. त्या वेळी बजाज ऑटो कंपनीसमोर आरोपीने वाहतुकीकडे दुर्लक्ष करून कंटेनर मागे घेतला. त्यामुळे अंकितच्या मोटारसायकलला जोरदार धडक बसली. या अपघातात डोक्याला, हातापायांना गंभीर दुखापत झाल्याने अंकितचा मृत्यू झाला. अपघातानंतर चालकाने जखमी अंकितला वैद्यकीय मदत न करता पलायन केले. निगडी पोलिस तपास करत आहेत.

टिपू सुलतान जयंतीसाठी महापालिकेने तातडीने विशेष निधी मंजूर करावा

■ पिंपरी (दै. संध्या)

म्हैसूरचे शूर आणि पराक्रमी शासक टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने यंदाच्या जयंती उत्सवासाठी तातडीने विशेष निधी मंजूर करावा. तसेच आगामी महानगरपालिका अर्थसंकल्पात दरवर्षी जयंतीनिमित्त स्वतंत्र निधीची कायमस्वरूपी तरतूद करावी, अशी मागणी पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने महानगरपालिका महापौर व आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

टिपू सुलतान यांच्या ऐतिहासिक कार्याची, शौर्याची आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध केलेल्या संघर्षाची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिकेने केवळ औपचारिक अभिवादन कार्यक्रम न घेता व्यापक स्वरूपात ऐतिहासिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रबोधनाचे उपक्रम आयोजित करावेत, अशी भूमिका काँग्रेसने मांडली आहे. निवेदनाद्वारे यंदाच्या जयंतीनिमित्त तातडीने विशेष निधी मंजूर करून शहरस्तरीय अभिवादन कार्यक्रम, ऐतिहासिक संदर्भ व्याख्यानमाला, ऐतिहासिक छायाचित्र व डिजिटल माहिती प्रदर्शन आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच सामाजिक सलोखा, सर्वधर्मीय ऐक्य आणि बंधुतेचा संदेश देणारे कार्यक्रम आयोजित करावेत. यावेळी नरेंद्र बनसोडे म्हणाले की, "इतिहासातील शौर्य, स्वाभिमान आणि संघर्षाची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे महानगरपालिकेने यंदाच्या जयंतीसाठी विलंब न करता तातडीने विशेष निधी मंजूर करावा.

वडमुखवाडी येथे पीएमपी बसमधून पडून महिला प्रवासी गंभीर जखमी



■ पिंपरी(दै. संध्या)

दरवाजा उघडा ठेवून भरधाव पीएमपी बसच्या चालकाने अचानक ब्रेक दाबल्याने महिला प्रवासी रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाली. ही घटना शनिवार (दि. १४) सायंकाळी पाचच्या सुमारास वडमुखवाडी येथील थोरल्या पादुका मंदिराजवळ घडली. याप्रकरणी जखमी महिलेने दिघी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, अज्ञात बसचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित चालक बसचा दरवाजा उघडा ठेवून भरधाव वेगात वाहन चालवत होता. प्रवासादरम्यान चालकाने अचानक ब्रेक दाबल्याने महिलेचा तोल गेला. त्या उघड्या दरवाजातून रस्त्यावर पडल्या. यामध्ये त्यांच्या डाव्या हाताच्या खुब्याला, डोक्याच्या मागील बाजूस आणि गुडघ्याला गंभीर दुखापत झाली. दिघी पोलिस तपास करत आहेत.

मोहननगर-रामनगरमधील ५० वर्षांपूर्वीच्या आरक्षणे रद्द करा!

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रारूप सुधारित विकास आराखड्यात मोहननगर आणि रामनगर परिसरातील जुन्या घरांवर टाकण्यात आलेली एमआयडीसी, एसआरए, रस्ते तसेच अन्य विकास आरक्षणे रद्द करावीत, अशी आग्रही मागणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केली आहे. प्रस्तावित रस्त्यांमुळे शेकडो नागरिक विस्थापित होण्याची शक्यता असून, नागरिकांच्या घरांवर बुलडोझर फिरवून विकास करण्यास आपला तीव्र विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या हिताचा विचार करून विकास आराखड्यात आवश्यक बदल न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. महापालिकेच्या प्रारूप सुधारित विकास योजनेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम २६ (२) अन्वये गठित नियोजन समितीसमोर सोमवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी झालेल्या जनसुनावणीत भापकर यांनी आपल्या हरकती व सूचना मांडल्या.

मोहननगर आणि रामनगर परिसरातील जुन्या विकास आराखड्यातील नऊ मीटरचे काही रस्ते नव्या आराखड्यात १२ मीटरचे दाखविण्यात आले आहेत. संतोषी माता मंदिर ते रामनगर तसेच रणझुंजार चौक ते शिवदर्शन कॉलनीमार्गे रामनगर हे प्रस्तावित रस्ते अस्तित्वात असलेल्या पर्यायी रस्त्यांपासून अवघ्या काही अंतरावर आहेत. त्यामुळे या रस्त्यांची आवश्यकता नसून, त्यासाठी शेकडो नागरिकांना विस्थापित करणे अन्यायकारक ठरेल, अशी भूमिका भापकर यांनी मांडली. के.पी. टॉवर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक कंपनीदरम्यान प्रस्तावित १२ मीटर रस्त्याचीही आवश्यकता नसल्याचे त्यांनी सांगितले. या मार्गावर कंपन्या कार्यान्वित असून, पुढील भागात पात्र झोपडीधारकांची वस्ती आहे. तसेच महात्मा बसवेश्वर चौक ते दातीर चाळ आणि संतोषी माता मंदिरापर्यंत पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याने नव्या रस्त्यामुळे नागरिकांचे नुकसान करू नये.

सुरक्षा अधिकारी जरांडे यांच्या सह आयुक्तपदावरील नियुक्तीला सचिन काळभोर यांचा विरोध

■ पिंपरी(दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सुरक्षा अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या उदय जरांडे यांची सह आयुक्तपदी नियुक्ती करण्याच्या प्रस्तावाला भाजप कार्यकर्ते तथा सामाजिक कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी तीव्र हरकत घेतली आहे. या नियुक्तीचा प्रस्ताव रद्द करावा, अशी मागणी त्यांनी महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महापालिकेच्या स्थायी समितीच्या २० नोव्हेंबर २०२६ रोजीच्या ठराव क्रमांक ६ अन्वये संबंधित नियुक्तीचा प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी सादर करण्यात येणार असल्याची माहिती मिळाल्याचे काळभोर यांनी निवेदनात म्हटले आहे.

सह आयुक्तपद हे महापालिकेतील अत्यंत महत्त्वाचे आणि जबाबदारीचे प्रशासकीय पद आहे. या पदावर नियुक्ती करताना संबंधित अधिकाऱ्याची शैक्षणिक पात्रता, प्रशासकीय अनुभव, सेवाज्येष्ठता, संवर्ग आणि पदोन्नतीचे निकष तपासणे आवश्यक आहे. त्यामुळे सुरक्षा अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या जरांडे यांची सह आयुक्तपदी नियुक्ती कोणत्या सेवा नियमांनुसार आणि प्रशासकीय निकषांच्या आधारे प्रस्तावित करण्यात आली आहे, याबाबत प्रशासनाने स्पष्टता द्यावी, अशी मागणी काळभोर यांनी केली आहे.

प्रस्तावित नियुक्तीची प्रचलित सेवा नियम, शासन निर्णय आणि प्रशासकीय तरतुदींनुसार सखोल पडताळणी करावी. संबंधित अधिकाऱ्याची शैक्षणिक पात्रता, प्रशासकीय अनुभव आणि सेवाविषयक कागदपत्रांची सक्षम स्तरावर तपासणी करावी. नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता राखून त्यामागील प्रशासकीय कारणे स्पष्ट करावीत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, या निवेदनातील हरकतींची दखल घेऊन नियमानुसार निर्णय होईपर्यंत प्रस्तावित नियुक्तीला अंतिम मंजुरी देऊ नये. सखोल पडताळणीत नियुक्ती सेवा नियम किंवा पात्रतेच्या निकषांशी विसंगत असल्याचे आढळल्यास नियुक्तीचा प्रस्ताव तातडीने रद्द करावा, अशी ठाम भूमिका सचिन काळभोर यांनी मांडली आहे.

महापालिकेतील महत्त्वाच्या प्रशासकीय पदांवरील नियुक्त्या या केवळ नियम, पात्रता आणि गुणवत्तेच्या आधारेच झाल्या पाहिजेत. प्रशासनात पारदर्शकता आणि नियमपालनाला सर्वोच्च प्राधान्य मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. या प्रकरणी आयुक्तांनी योग्य ती कार्यवाही करून त्याची लेखी माहिती द्यावी, अशी मागणी सचिन काळभोर यांनी केली आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



पुण्यात श्री सदगुरू शंकर महाराज प्रकटदिन सोहळा उत्साहात साजरा होणार

कवठे येमाई : दैनिक संध्या

पुण्यनगरीचे शक्तिपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धनकवडी येथील श्री सदगुरू शंकर महाराज यांच्या प्रकटदिनानिमित्त मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य नगरप्रदक्षिणा व पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सदगुरु शंकर महाराज मठाचे अन्नछत्र समितीचे अध्यक्ष राजाभाऊ रेवडे व डॉ. दिनेश रंगरेज यांनी दिली. दि. १७ नोव्हेंबरला होणाऱ्या कार्तिक शुद्ध अष्टमी (दुर्गाष्टमी) या शुभदिनी होणाऱ्या या सोहळ्यानिमित्त धार्मिक आणि भक्तिमय वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी कोल्हापूर येथील परमपूज्य सदगुरू श्री. गंगाभूत महाराज यांची प्रार्थनीय उपस्थिती लाभणार आहे.श्री सदगुरू शंकर महाराज अन्नछत्र समिती (ट्रस्ट) यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. धनकवडी, पुणे-सातारा रोड, पुणे येथील संस्थेच्या स्थळी हा धार्मिक सोहळा पार पडणार आहे.




उत्तर भारतीय भाविकांनी सूर्यदेवते केले पूजन

जेजुरी : दैनिक संध्या

महाराष्ट्राचे कुलदैवत श्री खंडोबारायांच्या मल्हार नगरीत उत्तर भारतीय बांधवांचे श्रद्धास्थान असलेला छठ महापर्व उत्सव सोमवारी पहाटे मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. जेजुरी येथील ऐतिहासिक होळकर तलाव ,पेशवे तलाव तसेच कऱ्हा नदीच्या काठावर छठ पूजेनिमित्त मोठ्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती. उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्य प्रदेश या राज्यांतून नोकरी, व्यवसाय आणि उद्योगाच्या निमित्ताने जेजुरी व पंचक्रोशीत स्थायिक झालेल्या परप्रांतीय बांधवांनी या धार्मिक सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पहाटे सूर्योदयाच्या वेळी महिला व पुरुष भाविकांनी नदीच्या आणि तलावाच्या पाण्यात उभे राहून सूर्यदेवतेचे, अर्थात सूर्यरूपी मार्तंड देवतेचे पूजन केले. पारंपरिक विधी आणि श्रद्धापूर्वक सूर्यदेवतेला अर्घ्य अर्पण करून कुटुंबाच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली.या कार्यक्रमात जेजुरी यथील छठ भविक अजित सिह मुकेश मिश्रा, हिरालाल यादव, संजय सिहं उषा यादव, त्रिपाठी शर्मा, दुबे ठाकूर पांडे इत्यादी उपस्थित होते. गेली 22 वर्षापासून जेजुरीत ही पूजा केली जात आहे. जेजुरी नगरनगरपरिषदेच्या वतीने पूजेच्या ठिकाणी मंडप, वीज पाणी याची सुविधा उपलब्ध करण्यात आली होती. जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, मार्तंड देवस्थानचे अध्यक्ष अॅड विश्वास पानसे, भाजपा जेजुरी शहर मंडल अध्यक्ष सचिन पेशवे, माजी विश्वस्त डॉ प्रसाद खंडागळे, भाजप महिला जिल्हा उपाध्यक्षा अलका शिंदे ,शिवसेना शहराध्यक्ष विठ्ठल सोनवणे, दादा उबाळे आदींनी उत्तर भारतीय छठ पूजा भाविकांना शुभेच्छा दिल्या.

अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी शाह (वाघोलीकर) यांची एकमताने निवड

बारामती : दैनिक संध्या





अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी मा. चंद्रगुप्त माणिकलाल शाह (वाघोलीकर) यांची शुक्रवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली. संस्थेचे माजी अध्यक्ष स्वर्गीय जवाहर शाह वाघोलीकर यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदावर त्यांची निवड करण्यात आली आहे. मा. चंद्रगुप्त माणिकलाल शाह वाघोलीकर यांचा अनेकांत एज्युकेशन सोसायटीशी अत्यंत जवळचा आणि जिव्हाळ्याचा संबंध आहे. ते गेल्या २० वर्षांपासून संस्थेच्या नियामक मंडळावर कार्यरत असून संस्थेच्या शैक्षणिक व संस्थात्मक वाटचालीत त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. विशेष म्हणजे त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण याच संस्थेच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात झाले आहे. त्यामुळे ज्या शैक्षणिक संस्थेच्या संस्कारात आणि शैक्षणिक वातावरणात त्यांची जडणघडण झाली, त्याच संस्थेच्या सर्वोच्च पदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे, ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. अनेकांत एज्युकेशन सोसायटीने गेल्या ६५ वर्षात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून, गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, सामाजिक बांधिलकी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. संस्थेच्या या उज्ज्वल परंपरेला पुढे नेत आधुनिक शिक्षणपद्धती, संशोधन, नवोपक्रम आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या क्षेत्रात संस्थेला नवी उंची प्राप्त करून देण्याची जबाबदारी नवनिर्वाचित अध्यक्षांवर राहणार आहे. या सभेमध्ये नियामक मंडळाच्या सदस्य पदावर धवल अभयकुमार शाह यांची नियुक्ती करण्यात आली. या दोघांच्या निवडीबद्दल संस्थेचे सचिव मा. मिलिंद शाह वाघोलीकर, खजिनदार मा. विकास शाह लेंगरेकर, नियामक मंडळाचे सर्व सदस्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, अनेकांत कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. दर्शन शाह, अनेकांत इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक डॉ. धनंजय बागुल , अनेकांत इंग्लिश मीडियम च्या प्राचार्या श्रीमती प्रणाली वडेर तसेच संस्थेतील विविध शैक्षणिक विभागांचे पदाधिकारी व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. स्वर्गीय जवाहर शाह वाघोलीकर यांनी संस्थेच्या विकासासाठी दिलेले योगदान आणि निर्माण केलेला वारसा पुढे नेण्याची संधी नवनिर्वाचित अध्यक्षांना मिळाली आहे.

पाटस रेल्वे स्थानकावरील प्रवाशांचा जीव धोक्यात

अर्धवट पादचारी पूल पूर्ण न केल्यास ४ जानेवारीनंतर रेल्वे रोको आंदोलनाचा इशारा

■ दौंड(दै. संध्या)

दौंड तालुक्यातील पाटस रेल्वे स्थानकावर अर्धवट अवस्थेत असलेल्या पादचारी पुलामुळे रेल्वे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अदानी सिमेंट कंपनीच्या वाढीव रेल्वे लाईनमुळे रेल्वे स्थानकाच्या उत्तर बाजूने प्रवाशांचा प्लॅटफॉर्मवर जाण्याचा संपर्क तुटला असून, तिकीट काढण्यासाठी तसेच रेल्वेतून उतरून बाहेर येण्यासाठी प्रवाशांना तब्बल चार रेल्वे लाईन ओलांडाव्या लागत असल्याचा गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

या धोकादायक परिस्थितीमुळे प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून, यापूर्वीही अनेक अपघात घडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यातच रेल्वे स्थानकाच्या उत्तर दिशेला दगडी खडीचा मोठ्या प्रमाणात साठा केला जात असल्याने प्रवाशांच्या अडचणींमध्ये आणखी भर पडत आहे.

या गंभीर समस्येकडे रेल्वे प्रशासन आणि अदानी सिमेंट कंपनीने तातडीने लक्ष देण्याची मागणी रयत क्रांती संघटना व कानगाव ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे. पाटस रेल्वे स्थानकावरील अर्धवट अवस्थेत असलेला पादचारी पूल त्वरित पूर्ण करावा, तसेच प्लॅटफॉर्मसमोरील उत्तर दिशेला असलेला खडीचा साठा हटवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात मध्य रेल्वेचे पुणे विभागीय व्यवस्थापक, पाटस रेल्वे स्टेशन मास्तर, अदानी सिमेंट कंपनी, दौंड तहसीलदार



आणि दौंड उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन देण्यात येणार असून, जिल्हाधिकारी पुणे, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार राहुल कुल यांनाही निवेदनाच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत.

पादचारी पुलाचे काम तातडीने पूर्ण करून प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. तसेच रेल्वे मार्गालगत असलेला खडीचा साठा हटवून प्रवाशांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा. प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास ४ जानेवारी २०२७ नंतर कोणत्याही क्षणी पाटस रेल्वे स्थानकावर अचानक रेल्वे रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा रयत क्रांती संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी रयत क्रांती संघटनेचे राज्य प्रवक्ते भानुदास शिंदे आणि दौंड तालुका अध्यक्ष सर्फराज शेख यांनी प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गांभीर्याने घेण्याची मागणी केली आहे.

प्रवाशांच्या जीविताशी संबंधित हा प्रश्न असल्याने रेल्वे प्रशासन आणि अदानी सिमेंट कंपनीने आंदोलनाची वेळ येण्यापूर्वीच पादचारी पुलाचे काम पूर्ण करावे, अशी मागणी पाटस व कानगाव परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

चाकणमधील किल्ले बनवा स्पर्धेत राजेशाही ग्रुप प्रथम

■ चाकण (दै. संध्या)

स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या सौजन्याने व स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या वतीने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या किल्ले बनवा स्पर्धेत राजेशाही ग्रुपचा प्रथम क्रमांक आला.

चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत खेड तालुक्यातील दीडशे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि सर्जनशीलतेचा वापर करून नैसर्गिक साधन सामग्रीच्या साहाय्याने विविध ऐतिहासिक किल्ल्यांच्या सुंदर प्रतिकृती तयार केल्या होत्या. माती, दगड, लाकूड, गवत आदी साहित्यांचा वापर करून साकारलेल्या या किल्ल्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले होते.

किल्ले बनवा स्पर्धेत प्रथम क्रमांक राजगुरुनगरच्या राजेशाही ग्रुपने पटकावला. या ग्रुपला जाहीर करण्यात आल्याप्रमाणे रोख ३ हजार रुपये, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन

इतिहासाची आवड निर्माण होण्यासाठी स्पर्धा आवश्यक

" मोबाईल आणि तंत्रज्ञानाच्या युगात मुलांचा ऐतिहासिक वारशाशी असलेला संबंध कमी होत चालला आहे. किल्ले बनवा स्पर्धांमुळे विद्यार्थी स्वतः किल्ले तयार करतात. इतिहास वाचून शिवाजी महाराजांच्या कार्याशी जोडले जातात. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची आवड निर्माण होण्यासाठी स्पर्धा आवश्यक आहेत." - मनीषा गोरे, नगराध्यक्षा, चाकण.



गौरविण्यात आले.

द्वितीय क्रमांक चाकण दावडमळा येथील शिवछत्रपती मित्र मंडळ यांनी मिळवला. त्यांना रोख २ हजार रुपये व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. तृतीय क्रमांक ऋषिकेश विठ्ठल वाघ यांनी मिळवला असून, त्यांना रोख १ हजार रुपये व ट्रॉफी देण्यात आली. उत्तेजनार्थ पारितोषिक प्रणाली विजय कांडगे, ऋतुराज सोमा गावडे व सारा कस्तुरी बॉईज यांना देण्यात आले.

चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, नगरसेवक मंगेश कांडगे, बालरंगभूमी परिषदेचे उपाध्यक्ष नारायण करपे, पर्यावरणप्रेमी मनोहर शेवकरी, उद्योजक निलेश गोरे, ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, भामा इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या माधुरी गोरे व स्व. आ. सुरेशभाऊ गोरे ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य सचिन आभाळे आदींच्या हस्ते किल्ले बनवा स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

व्यवस्थापन क्षेत्रातील कंपन्यांच्या यादीत झळकतय टीएसपीएल उद्योग समूहाचे नाव

■ चाकण (दै. संध्या)

भारतातील मनुष्यबळ पुरवठा आणि कर्मचारी व्यवस्थापन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कंपन्यांमध्ये येथील टीएसपीएल उद्योग समूहाचे नाव झळकत आहे.

सन २०२६ साठी भारतातील आघाडीच्या मनुष्यबळ पुरवठा आणि कर्मचारी व्यवस्थापन क्षेत्रातील कंपन्यांपैकी टीएसपीएल उद्योग समूहाची कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मेहबूब सैय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली निवड प्रक्रियेसाठी प्राथमिक यादीत निवड झाली आहे. प्रसिद्ध सिलिकॉन इंडिया मासिकाच्या विशेष अंकासाठी देशभरातील मनुष्यबळ पुरवठा आणि कर्मचारी व्यवस्थापन क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपन्यांचा अभ्यास करण्यात येत आहे. बदलत्या औद्योगिक गरजा, आधुनिक कार्यपद्धती, क्षेत्रनिहाय नावीन्यपूर्ण उपक्रम आणि रोजगार व्यवस्थापनातील योगदान या बाबींच्या आधारे विविध संस्थांचा विचार केला जात आहे.

या निवड प्रक्रिये दरम्यान टीएसपीएल उद्योग समूहाच्या कार्याची आणि संस्थेचे अध्यक्ष डॉ. मेहबूब सैय्यद यांच्या नेतृत्वाची विशेष दखल घेण्यात आली आहे. मनुष्यबळ पुरवठा आणि कर्मचारी व्यवस्थापन क्षेत्रातील संस्थेचे योगदान, नेतृत्व दृष्टी आणि प्रत्यक्ष कार्यपद्धती यांचा विशेष लेखाच्या माध्यमातून आढावा घेण्याचे प्रस्तावित आहे. या विशेष अंकामध्ये टीएसपीएल उद्योग समूहाच्या नेतृत्वाचा दृष्टिकोन, संस्थेची कार्य दिशा आणि उद्योग क्षेत्रातील योगदान यांना दोन पानांच्या विशेष लेखाद्वारे स्थान देण्याचे प्रस्तावित आहे.

संबंधित लेखाची छापील आणि डिजिटल आवृत्तीत प्रसिद्धी, पुनर्मुद्रणाचे अधिकार, समावेशाचे प्रमाणपत्र, प्रकाशित अंकाच्या दोन प्रती तसेच मासिकाच्या संकेत स्थळावर आणि समाज माध्यमांवर प्रसिद्धी यांचा प्रस्तावित समावेश आहे. टीएसपीएल उद्योग समूहासाठी ही निवड अभिमानाची बाब असून, भारतीय मनुष्यबळ पुरवठा आणि कर्मचारी व्यवस्थापन क्षेत्रातील संस्थेच्या कार्याला व्यापक स्तरावर ओळख मिळवून देणारी कौतुकास्पद बाब आहे.

डॉ.मेहबूब सैय्यद यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर

■ चाकण (दै. संध्या)



येथील टीएसपीएल उद्योग समूहाचे अध्यक्ष डॉ. मेहबूब सैय्यद यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या १ डिसेंबरला इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

डॉ. सैय्यद यांच्या नेतृत्वाचा, कार्याचा आणि मानव संसाधन व्यवस्थापन व मनुष्यबळ पुरवठा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव होणार आहे. इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथील प्रतिष्ठित युरोप बिझनेस असेंब्ली (ईबीए) यांच्या वतीने त्यांना २३ व्या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. भारतामध्ये मानव संसाधन व्यवस्थापन आणि मनुष्यबळ पुरवठा क्षेत्रात दिलेले महत्त्वपूर्ण योगदान, नेतृत्वगुण आणि व्यावसायिक उत्कृष्टतेसाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा आंतरराष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. सैय्यद यांच्या नेतृत्वाखाली टीएसपीएल उद्योग समूहाने मानव संसाधन व्यवस्थापन, मनुष्यबळ व्यवस्थापन, भरती प्रक्रिया, कंत्राटी मनुष्यबळ पुरवठा तसेच राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना, राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण योजना आणि विविध शिकाऊ उमेदवारी उपक्रमांच्या माध्यमातून अनेक उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. टीएसपीएल उद्योग समूहासाठी डॉ. सैय्यद यांचा होणारा हा आंतरराष्ट्रीय सन्मान सर्वांसाठी अभिमानाची बाब असून, भारतीय मानव संसाधन व्यवस्थापन आणि मनुष्यबळ पुरवठा क्षेत्रासाठीही गौरवास्पद ठरणार आहे.

२० नोव्हेंबरला भव्य महाआरोग्य शिबिराचा महामेळावा!

हजारो रुग्णांना मोफत आरोग्यसेवेची संधी; तपासणीपासून शस्त्रक्रियेपर्यंत सुविधा उपलब्ध

■ जुन्नर (दै. संध्या)

ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, तसेच आर्थिक परिस्थितीमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या गरजू रुग्णांना दिलासा मिळावा, या सामाजिक बांधिलकीतून श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्ट, गोळेगाव आणि डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या माध्यमातून विविध आजारांची मोफत तपासणी, औषधोपचार आणि आवश्यकतेनुसार मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या महाआरोग्य शिबिरात हृदयरोग, मधुमेह, नेत्ररोग, मोतीबिंदू, कर्करोग, किडनी व लिव्हरचे विकार, महिलांचे विविध आजार, तसेच इतर गंभीर व सामान्य आजारांची तपासणी करण्यात येणार आहे. रक्त व लघवी तपासणीसह तज्ज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय सल्ला,



आवश्यक औषधोपचार आणि गरजेनुसार शस्त्रक्रियेची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

शिबिरामध्ये आयुष्मान वय वंदना योजनेअंतर्गत पात्र ज्येष्ठ नागरिकांसाठी नोंदणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच गरजू व्यक्तींना श्रवणयंत्र वाटपासाठी पूर्वतपासणी व नावनोंदणी, दिव्यांग व्यक्तींसाठी आवश्यक साहित्य व उपकरणांच्या वाटपासाठी तपासणी अशा विशेष सुविधांचाही समावेश करण्यात आला आहे.

या उपक्रमासाठी विविध नामांकित रुग्णालये, वैद्यकीय संस्था आणि तज्ज्ञ डॉक्टरांचे सहकार्य लाभणार असून, नागरिकांना एकाच ठिकाणी विविध आरोग्यविषयक सुविधा मिळणार आहेत.

शिबिराचे ठिकाण व वेळ : शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३.३० या वेळेत श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्ट, यात्री निवास भाग २, गोळेगाव, ता. जुन्नर येथे हे शिबिर पार पडणार आहे.

शिबिराचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी आधारकार्ड, रेशनकार्ड व लागू असल्यास दिव्यांग प्रमाणपत्र सोबत आणावे. रुग्णांच्या सोयीसाठी जुन्नर नवीन बसस्थानक व लेण्याद्री फाटा येथून शिबिरस्थळी येण्या-जाण्यासाठी वाहनव्यवस्था करण्यात आली आहे.

"आरोग्य हीच खरी संपत्ती असून, मोफत उपचारांची ही संधी गरजू रुग्णांसाठी मोठा आधार ठरणार आहे. त्यामुळे जुन्नर तालुक्यासह परिसरातील नागरिकांनी, ज्येष्ठांनी आणि गरजू रुग्णांनी या महाआरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा" ! असे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

एसीबीच्या जाळ्यातून पसार झालेला शिरूर पोलीस ठाण्यातील हवालदार जेरबंद

९५ हजारांची लाच स्वीकारून झाला होता फरार; दीड महिन्यानंतर शिरूर नगरपरिषद परिसरातून अटक, २० नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी

■ कवठे येमाई (दै. संध्या)

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) सापळ्यात ९५ हजार रुपयांची लाच स्वीकारल्यानंतर पथकाच्या हातावर तुरी देऊन पसार झालेला शिरूर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार सतीश नाथराव मुंढे अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. तब्बल दीड महिन्यापासून फरार असलेल्या मुंढेला सोमवारी (दि. १६) सकाळी साडेअकराच्या सुमारास एसीबीच्या पुणे पथकाने शिरूर नगरपरिषद परिसरातून ताब्यात घेऊन अटक केली. न्यायालयाने त्याला २० नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या अटकेमुळे शिरूर पोलीस ठाण्याशी संबंधित गाजलेल्या लाचखोरी प्रकरणाला महत्त्वाचे वळण मिळाले आहे.

शिरूर पोलीस ठाण्यात तक्रारदाराविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यांत अटक न करण्यासाठी तसेच प्रकरणात मदत करण्याच्या मोबदल्यात मुंढे याने एक लाख रुपयांची लाच मागितल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती. त्यानुसार ३० सप्टेंबर २०२६ रोजी टाकळी हाजी पोलीस चौकीत पंचांसमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. यावेळी सुरुवातीला एक लाख रुपये आणि तडजोडीनंतर ९५ हजार रुपये देण्याचे निश्चित झाल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर एसीबी ने सापळा रचला. टाकळी हाजी पोलीस चौकीत मुंढे याने तक्रारदाराकडून पंचांसमक्ष ९५ हजार रुपयांची लाच



स्वीकारली. मात्र, एसीबीच्या पथकाची चाहूल लागताच त्याने स्वीकारलेली लाच रक्कम आणि तक्रारदाराविरुद्ध दाखल गुन्ह्याची कागदपत्रे घेऊन तेथून पलायन केले. या प्रकारामुळे एसीबीच्या कारवाईत ही खळबळ उडाली होती. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मुंडे फरार झाल्यापासून त्याचा शोध सुरू होता.अखेर एसीबीचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे,अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील आणि पोलीस उपअधीक्षक सतीश वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुहास हट्टेकर यांनी त्याला शिरूर नगरपरिषद परिसरातून अटक केली. त्यानंतर विशेष न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २० नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली.लाचेची रक्कम कुठे गेली ? गुन्ह्याची कागदपत्रे कोणाकडे होती ? या व्यवहारात आणखी कोणाचा सहभाग आहे का ? मुंढेच्या अटकेनंतर या प्रश्नांची उत्तरे तपासातून समोर येण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या पुढील तपासाकडे शिरूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



अंशुम हरकेचा बासरी वादनात आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

पुणे : दैनिक संध्या

व्हिएतनाम येथे आयोजित 'ग्लोबल भारत आर्ट्स फेस्टिव्हल २०२६' या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पुण्याच्या अंशुम मंदार हरके याने बासरीवादनाच्या खुल्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. ऑल इंडिया कल्चरल ऑर्गनायझेशनतर्फे आयोजित या महोत्सवात अंशुमने आपल्या सुरेल आणि भावपूर्ण सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकली. अंशुम हा बिबवेवाडी येथील पुरोहित अकॅडमीमध्ये अभिलाष राजर्षी यांच्याकडे बासरी वादनाचे प्रशिक्षण घेत आहे. तो भिलारेवाडी येथील आर्यन वर्ल्ड स्कूलमध्ये इयत्ता आठवीत शिकत आहे. शालेय शिक्षणासोबत संगीताची साधना करत त्याने मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, भारतीय शास्त्रीय संगीताचा ठसा आंतरराष्ट्रीय स्तरावर उमटविण्याच्या त्याच्या प्रयत्नांचे कौतुक होत आहे.

अनधिकृत खोदकाम करणाऱ्यावर तात्काळ गुन्हे दाखल करा रविराज काळे

पुणे : दैनिक संध्या

पुणे शहरातील पर्यावरणाचा कणा असलेल्या टेकड्यांवर होणाऱ्या बेकायदेशीर अतिक्रमणाविरोधात 'आम आदमी पार्टी' आक्रमक झाली आहे. पुणे पेठ कोथरूड येथील सर्व्हे नं. 113 मधील बिडीपी व हिलटॉप परिसरात कोणत्याही परवानगीशिवाय टेकडी फोडून पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणावर -हास करणाऱ्या 'मे. हिलतेज रियालिटी ॲन्ड डेव्हलपर्स एल. एल. पी.' या बांधकाम व्यावसायिकावर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी जोरदार मागणी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या प्रकरणी आम आदमी पार्टीच्यावतीने आयुक्तांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गंगाधाम परिसरातील टेकडी फोड प्रकरणाप्रमाणेच कोथरूडमधील सुतारदरा भागातही अनधिकृत खोदकाम करून परिसराचे अतोनात नुकसान केले जात आहे. या प्रकरणी पुणे महानगरपालिकेने या विकासकाला काम थांबवण्याची नोटीस बजावली होती. तसेच जेसीबीच्या साहाय्याने सुरू असलेले खोदकाम थांबवण्याचे आदेश दिले होते. मात्र, केवळ काम थांबवून चालणार नाही, तर पर्यावरणाचा -हास करणाऱ्या आणि टेकड्यांचे नुकसान करणाऱ्यांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रमुख मागण्या: 1) सुतारदरा कोथरूड येथील अनधिकृत गौण खनिजाची तात्काळ ईटीएस (ETS) मोजणी करण्यात यावी. 2) पर्यावरण नष्ट करणाऱ्या 'मे. हिलतेज रियालिटी ॲन्ड डेव्हलपर्स एल. एल. पी.' या बांधकाम व्यावसायिकावर तात्काळ गुन्हा दाखल करावा. 3) या देशोधडीच्या प्रकाराला आणि अनधिकृत कामाला पाठीशी घालणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी. 4) त्या ठिकाणी आतापर्यंत किती झाडे तोडली गेली, याचा सविस्तर अहवाल तयार करून, त्या झाडांच्या एकूण वयाएवढी नवीन झाडे त्याच विकासकाकडून लावून घेण्यात यावीत. पुण्याच्या टेकड्या म्हणजे शहराचे नैसर्गिक आणि महत्त्वाचे पर्यावरण आहे. पर्यावरणाचा घात करणाऱ्या कोणालाही थारा दिला जाणार नाही. या प्रकरणात आयुक्तांनी तात्काळ लक्ष घालून विकासकावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच जमिनीचा अधिकृत सर्वेक्षण अहवाल, खोदकामाची ईटीएस ETS मोजणी, परवानगीची स्थिती, आणि पर्यावरण नुकसानाचे मूल्यांकन याची सविस्तर माहिती लिखित स्वरूपात द्यावी, अशी मागणी आम आदमी पार्टी महाराष्ट्र राज्य युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविराज बबन काळे यांनी केली आहे

कांताबाई चौधरी यांचे निधन

कोरेगावमुळ : दैनिक संध्या



पूर्व हवेली तालुक्यातील नायगाव येथील सौ.कांताबाई दादासाहेब चौधरी यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात पती, तिन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. माजी सरपंच तथा यशवंत सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक दादासाहेब चौधरी यांच्या पत्नी होत्या.

कुंभच्या नावे आधी बनावट वर्कऑर्डर

नाशिक : दैनिक संध्या

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर कुंभमेळ्याच्या नावाचा वापर करून नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रकार पुन्हा समोर आला आहे. सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अधिकृत अकाउंट असल्याचे भासविणारे बनावट इन्स्टाग्राम अकाउंट तयार करणाऱ्याविरुद्ध नाशिक शहर सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ऑफिशियल डॉट कुंभनगरी नाशिक या नावाने हे अकाउंट सुरू करण्यात आले होते. त्यावरून कुंभमेळ्यातील रिल्स आणि पोस्ट केल्या जात होत्या. यापर्वी बनावट वर्कऑर्डरच्या नावाने कामाचे टेंडर देण्याचा प्रकार झाला होता. यापूर्वीही एप्रिल २०२६ मध्ये कुंभमेळ्याच्या पायाभूत सुविधांच्या कामांसाठी तब्बल ३५ कोटी रुपयांचे बनावट कार्यादेश तयार करून इंटरनेटवर प्रसारित केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. ऑगस्ट २०२६ मध्ये कुंभमेळ्याशी संबंधित कंत्राट मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यावसायिकाची २.१७ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नाशिक पोलिसांनी कारवाई केली होती. १५ नोव्हेंबर रोजी नवा प्रकार निदर्शनास आला. संबंधित इन्स्टाग्राम अकाऊंटची पाहणी केली असता ते नागरिकांची दिशाभूल करीत असल्याचे आढळले. याप्रकरणी सायबर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

फलटण तालुक्यात आढळला आप्रिकन अमूर फाल्कन पक्षी

आदर्की : दैनिक संध्या

जगातील सर्वात लांब स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांपैकी एक असलेला 'अमूर फाल्कन' नुकताच फलटण तालुक्यात आढळून आला आहे. तालुक्यात या पक्ष्याची ही पहिलीच नोंद असून, यामुळे सातारा जिल्ह्याच्या पक्षी निरीक्षणाच्या इतिहासात एका नव्या पक्षाची भर पडली आहे. सायबेरिया आणि उत्तर चीनमध्ये प्रजनन करणारा हा छोटासा शिकारी पक्षी दरवर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात दक्षिण आफ्रिकेकडे स्थलांतर करतो. या प्रवासात तो भारतामार्गे जातो. आतापर्यंत हा पक्षी मुख्यत्वे नागालँड, मणिपूर आणि आसाममध्ये मोठ्या थव्याने दिसत होता. नागालँडमधील दोयांग जलाशय परिसर तर 'फाल्कन कॅपिटल ऑफ द वर्ल्ड' म्हणून ओळखला जातो. मात्र, आता तो फलटणमध्ये आढळल्याने त्याच्या स्थलांतर मार्गाबद्दल नव्याने संशोधन करण्याची गरज निर्माण झाली आहे. गणेश धुमाळ व रवी लिपारे पक्षी निरीक्षक व वन्यजीव छायाचित्रकार, नेचर अँड वाइल्डलाइफ वेल्फेअर सोसायटी, फलटणचे सदस्य यांनी फलटण परिसरात हा पक्षी पाहिला आणि त्याचे छायाचित्रण केले.

बारामती येथे काव्य सोहळा व कवी संमेलन उत्साहात संपन्न

अभिमान बारामतीचा उपक्रमातून साहित्यिकांचा सन्मान व दिवाळी अंकांचे प्रकाशन



■ वडगाव निंबाळकर (दै. संध्या)

पंचक्रोशी प्रकाशन,भाग्यलक्ष्मी सोशल फाउंडेशन आणि चंदूकाका सराफ यांच्या संयुक्त विद्यमाने वडगाव निंबाळकर (बारामती) येथे काव्य सोहळा व कवी संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाला मा.श्री.संभाजीनाना होळकर,मा.मेघराज राजेभोसले, स्वागताध्यक्ष कविवर्य विनोद खटके,मा. किशोरकुमार शहा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी प्रा.श्री.रविंद्र कोकरे सर व श्री.बाळासाहेब कर्चे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल शिंदे व सुचेता जाधव यांनी केले.

यावेळी अध्यक्षांनी आपल्या भाषणात सध्याची परिस्थिती व पडलेला दुष्काळ यावर भावस्पर्शी विचार मांडून रसिकांची मने जिंकली.अत्रे मॅडम यांनी मार्गदर्शन केले व उपस्थित साहित्यिकांचे कौतुक केले. यावेळी उपस्थित कवी-कवयित्रींचा मान्यवरांच्या हस्ते फेटा,सन्मानपत्र व दिवाळी अंक देऊन सत्कार करण्यात आला.आदरणीय शर्मिला ताईंनी सर्व मान्यवर,कवी,रसिक श्रोते,आयोजक व नियोजक यांचे आभार मानले.कार्यक्रमाचा सोहळा अतिशय छान पद्धतीने पार पडला.

सौंदर्यापलीकडचा विचार मांडणारा 'मुक्ता' फॅशन शो १२ डिसेंबरला पुण्यात

■ पुणे (दै. संध्या)



समाजातील विविध स्तरांतील महिलांचे संघर्ष, त्यांचे भावविश्व, सुप्त सामर्थ्य आणि सन्मानाने जगण्याची आकांक्षा कलात्मक पद्धतीने समाजासमोर मांडणारा 'मुक्ता' हा अनोखा संकल्पनात्मक फॅशन शो शनिवार, १२ डिसेंबर रोजी पुण्यातील वडगाव शेरी येथील रामचंद्र सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. 'नऊ अस्तित्वं... नऊ संघर्ष... नऊ निसर्गरूपं... आणि स्वातंत्र्याची एक नवी पहाट!' अशी मध्यवर्ती संकल्पना असलेल्या या कार्यक्रमात नऊ वेगवेगळ्या महिलांच्या आणि तृतीयपंथी व्यक्तीच्या जीवनकहाण्या निसर्गातील नऊ प्रतीकात्मक रूपांतून साकारण्यात येणार आहेत. या कार्यक्रमासोबत 'मॅजेस्टिक महाराष्ट्र २०२६ – मिस | मिसेस | मिस्टर' या राज्यस्तरीय स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे.

'मुक्ता'मध्ये विधवा महिला, एकल माता, दिव्यांग महिला, अन्याय व अत्याचारातून सावरणारी महिला, कॉर्पोरेट क्षेत्रात कार्यरत असूनही भावनिक संघर्षाला सामोरे जाणारी महिला, तृतीयपंथी व्यक्ती आणि वृद्ध महिला अशा नऊ व्यक्तिरेखांचा जीवनप्रवास सादर केला जाणार आहे. विशेष म्हणजे, या व्यक्तिरेखा अग्नी, वायू, जल, आकाश, पृथ्वी, प्राणी, पक्षी, वृक्ष आणि फुले अशा निसर्गातील नऊ प्रतीकात्मक रूपांच्या माध्यमातून उलगडणार आहेत. प्रतिकूल परिस्थितीतून पुन्हा उभे राहणे, स्वतःला नव्याने घडविणे आणि आयुष्याला नवी दिशा देणे, हा या प्रतीकांचा संदेश आहे.

आकर्षक वेशभूषा, भावस्पर्शी संगीत, प्रभावी प्रकाशयोजना आणि नाट्यमय रंगमंचीय सादरीकरणातून या व्यक्तिरेखांचा जीवनप्रवास प्रेक्षकांसमोर मांडण्यात येणार आहे. त्यांच्या वेदना आणि संघर्षांचे चित्रण करतानाच त्यांच्यातील जिद्द, आत्मविश्वास, सामर्थ्य आणि नव्याने आयुष्य उभे करण्याची इच्छाशक्ती अधोरेखित केली जाणार आहे. या कार्यक्रमांतर्गत 'मॅजेस्टिक महाराष्ट्र २०२६ – मिस | मिसेस | मिस्टर' या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. डॉक्टर, अभियंते, वकील, पोलीस, शिक्षक, चार्टर्ड अकाउंटंट, बँकिंग क्षेत्रातील व्यावसायिक, उद्योजक तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत महिला व पुरुषांना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

छत्रपती शिवरायांच्या विचारांचे संस्कार तरुण पिढीवर होणे गरजेचे

■ पुणे (दै. संध्या)



छत्रपती शिवाजी महाराज यांना लहान वयातच स्वराज्य निर्माण करण्याची कल्पना मनामध्ये आली. यामागे राजमाता जिजाऊ आणि शहाजीराजे यांची शिकवण होती. त्यांच्या संस्कारामुळे शिवराय केवळ छत्रपती शिवाजी महाराज झाले नाहीत तर ते एक धीरूदत्त आणि आदर्शवत व्यक्ती झाले. त्यामुळेच ते हिंदवी स्वराज्य स्थापन करू शकले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार तरुण पिढी पर्यंत पोहोचणे गरजेचे आहे , त्यांच्या मनावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचे संस्कार होणे गरजेचे आहे तरच आपण बलशाली राष्ट्र निर्माण करू शकू, असा विश्वास श्रीराम जन्मभूमी न्यासाचे महासचिव प.पू. स्वामी गोविंददेव गिरी जी महाराज यांनी व्यक्त केले.

माहेश्वरी परिवार फाउंडेशन आणि समस्त माहेश्वरी समाज यांच्यातर्फे महालक्ष्मी लॉन्स येथे प. पू. स्वामी गोविंददेव गिरी जी महाराज यांचे 'राजर्षी शिवछत्रपती स्फूर्ती गाथा' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी ते बोलत होते. स्वामी गोविंददेव गिरी जी महाराज म्हणाले, हिंदूंचे बोळसट मन कायम त्यांचा नाश करत आले आहे. ज्यांच्यावर विश्वास टाकता कामा नये, त्यांच्यावर विश्वास टाकल्याने हिंदूंची राज्यच्या राज्य बुडाली. यातून हिंदूंनी धडा घेतला पाहिजे .

सोनी सबने प्रसिद्ध गायक अमित मिश्रा यांनी गायलेले 'मेरी वाली चुडैल है' हे खास गाणे केले प्रदर्शित

■ पुणे (दै. संध्या)



आपल्या आगामी शो लो चुडैल चली ससुरालभोवतीचा उत्साह आणखी वाढवत, सोनी सबने 'मेरी वाली चुडैल है' हे खास गाणे प्रदर्शित केले आहे. हे गाणे प्रसिद्ध गायक अमित मिश्रा यांनी गायले आहे. दमदार संगीत आणि खोडकर रॅपच्या सुरेल मिलाफाने सजलेले हे गाणे शोच्या कथानकाच्या मध्यभागी असलेल्या अनोख्या प्रेमकथेचं सुंदर चित्रण करतं. या गाण्यात हिबा नवाबने आपल्या रॅप परफॉर्मन्सद्वारे एक खास रंग भरला आहे.

अमित मिश्रा यांच्यासाठी हे गाणं एका सिटकॉमच्या प्रमोशनल ट्रॅकसाठी पहिल्यांदाच आपला आवाज देण्याचा अनुभव ठरला, त्यामुळे ही त्यांच्यासाठी एक उत्साहवर्धक आणि ताजेतवानी संगीतयात्रा होती. या गाण्यामुळे त्यांना एक मजेशीर, खोडकर आणि पारंपरिक चौकटीबाहेरील ध्वनीशैलीसोबत प्रयोग करण्याची संधी मिळाली, जी या शोच्या खेळकर फॅन्टसी विश्वाचं अचूक प्रतिनिधित्व करते. गाण्याबद्दल बोलताना अमित मिश्रा म्हणाले, "खरं तर, सिटकॉमसाठी गाणं रेकॉर्ड करण्याचा हा माझा पहिलाच अनुभव होता, त्यामुळे माझ्यासाठी तो एक वेगळा आणि मजेशीर अनुभव होता. मला ही संकल्पना खूप आवडली आणि अर्थातच, व्होकल डब सत्रादरम्यान आम्ही खूप मजा केली.

बालदिनानिमित्त सर्वात मोठा खोडकर कोण आणि सर्वात शिस्तप्रिय कोण?

सोनी सबच्या हस्तिनापूर के वीरच्या कलाकारांनी उलगडली पडद्यामागची रहस्ये

■ पुणे (दै. संध्या)



सोनी सबचा हस्तिनापूर के वीर हा शो महाभारतातील दिग्गज पांडव आणि कौरवांची भूमिका साकारणाऱ्या गुणी बालकलाकारांना एकत्र आणतो. पडद्यावर त्यांच्या व्यक्तिरेखा स्पर्धा, आव्हाने आणि गुरुकुलातील शिकवणींमध्ये गुंतलेल्या असतात, मात्र पडद्यामागचं वातावरण पूर्णपणे वेगळं असतं. तिथे हास्य, खेळीमेळीची मस्करी आणि भरपूर खोड्या यांचीच रेलचेल असते. यंदाच्या बालदिनानिमित्त, या मालिकेतील कलाकारांनी त्यांच्या व्यक्तिरेखांमागील खऱ्या स्वभावाची मजेशीर झलक दिली आहे आणि कॅमेरे बंद झाल्यानंतर सेटवर सगळ्यांचे मनोरंजन कोण करतं, याचा खुलासा केला आहे. काही बालकलाकार त्यांच्या खोडकर स्वभावासाठी ओळखले जातात, तर काहीजण त्यांच्या वयाच्या तुलनेत आश्चर्यकारकरीत्या शिस्तप्रिय आणि परिपक्व आहेत. त्यामुळे हस्तिनापूर के वीरचा सेट हा बालसुलभ निरागसता, मैत्री आणि धमाल यांचा एक उत्साही संगम बनला आहे.

द्रोणाचार्यांची भूमिका साकारणारे जितेन लालवानी म्हणाले, "भीमची भूमिका साकारणारा सुभाष हा निश्चितच सेटवरील सर्वात मोठ्या खोडकरांपैकी एक आहे. तो नेहमी काही ना काही खोड्या करण्यात व्यस्त असतो आणि सगळ्यांचं मनोरंजन करत असतो. अर्जुनची भूमिका साकारणारा उर्वा कदाचित सर्वात निरागस आहे, पण तोही खूप खोडकर असू शकतो! सहदेवची भूमिका करणारा मयंक हा असा असतो की, ब्रेक मिळाला की त्याला लगेच खेळायला सुरुवात करायची असते.

नकुलची भूमिका साकारणारा हरित आणि दुःशासनची भूमिका करणारा शौर्य हे दोघेही त्यांच्या निरागस चेहऱ्यांमुळे सर्वात गोंडस वाटतात. दुर्योधनची भूमिका करणारा आयुध आपल्या अभिनयात खूपच उत्तम आहे, पण त्याच वेळी सेटवर मजा करण्याची एकही संधी तो सोडत नाही.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आमदारांचे एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस : उपमुख्यमंत्री पवार

लोकनेते स्व.अजितदादांच्या विचारांचा वारसा जपत शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचा पुढाकार

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांना आर्थिक मदत मिळावी,या उद्देशाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विधानसभा व विधान परिषदेतील सर्व आमदारांनी आपले एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार आज मंत्रालय,मुंबई येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या हस्ते या वेतनाचे धनादेश मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

राज्यातील शेतकरी बांधव सध्या दुष्काळाच्या संकटाचा सामना करत आहेत.अशा कठीण परिस्थितीत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देणे, हीच स्वर्गीय अजितदादांनी आपल्याला दिलेली शिकवण आहे.

दादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या हिताला प्राधान्य दिले.त्यांच्या याच विचारांचा आणि सामाजिक बांधिलकीचा वारसा पुढे नेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व आमदारांनी आपल्या एका महिन्याच्या वेतनाचे योगदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

शेतकरी बांधवांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी शक्य ते सर्व योगदान देणे,ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.राज्यातील शेतकरी बांधवांच्या हितासाठी आणि त्यांच्या मदतीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सदैव कटिबद्ध राहील.






दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



नारायणगाव येथे बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

नारायणगाव : दैनिक संध्या

ग्रामपंचायत नारायणगाव कार्यालय येथे हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना पुण्यतिथीनिमित्त प्रतिमापूजन करून पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख, उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे, शिवसेना शहरप्रमुख संतोष वाजगे, ग्रामपंचायत सदस्य गणेश पाटे, संतोष दांगट, तसेच अजित वाजगे, समीर गावडे, मुकेश वाजगे, निलेश दळवी, रज्जाक काझी यासह ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

शिरूरमध्ये अनोळखी महिलेचा मृत्यू; ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे आवाहन

शिरूर : दैनिक संध्या

शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अनोळखी महिलेचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी शिरूर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. शिरूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत महिला अंदाजे ७० ते ७५ वर्षे वयाची असून, अंगात नेसणीसाठी मेंहदी रंगाचा पंजाबी ड्रेस, खाली लाल रंगाचा परकर, गळ्यात लाल रंगाच्या पदराच्या रंगाचा मध्यम माळा, डोक्याचे केस लांब असून दोन्ही हातांमध्ये हिरव्या रंगाच्या काचेच्या बांगड्या होत्या. तसेच डाव्या हाताच्या पोटरीवर 'राधा' असे मराठीत नाव गोंदलेले आहे. सदर महिला दिनांक १० ऑक्टोबर २०२३ रोजी पाषाणमळा, संग्राम हॉटेलच्या शेजारी, अहमदनगर-पुणे रोडच्या कडेला, शिरूर तालुका, पुणे जिल्हा येथे आढळून आली होती. महिला अंगावर पांघरून घेऊन झोपलेल्या अवस्थेत होती. तिच्या नाकातून रक्तस्राव होत असल्याचे तसेच कोणत्याही प्रकारची हालचाल नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर तिला बेशुद्ध अवस्थेत मृत स्थितीत मिळून आली. या अनोळखी मृत महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास किंवा तिच्या नातेवाईकांची ओळख पटत असल्यास शिरूर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक सुधीर टेंगले यांनी केले आहे.

पुण्यासाठी स्वतःचे धरण बांधण्याचा सरकारकडे प्रस्ताव पाठवा : निलेश निकम



पुणे : दैनिक संध्या

शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती गरज लक्षात घेता पुणेकरांना पाणीपुरवठ्यासाठी जलसंपदा विभागावर अवलंबून राहण्याऐवजी महापालिकेने स्वतःचे धरण बांधावे, अशी मागणी महापालिकेतील विरोधी पक्षनेते ॲड. निलेश निकम यांनी केली आहे. स्वतःच्या मालकीचे धरण बांधण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठवावा, असा ठराव त्यांनी महापालिकेच्या नगरसचिव कार्यालयाकडे सादर केला आहे. जलसंपदा विभागाकडून पुण्याच्या पाणी कोट्यात वाढ करण्याबाबत सातत्याने हात आखडता घेतला जात आहे. त्यामुळे शहराच्या वाढत्या पाण्याच्या गरजा पूर्ण करताना महापालिकेला अडचणींचा सामना करावा लागत आहे. भविष्यातील लोकसंख्या वाढ आणि पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता स्वतःचे धरण असणे आवश्यक आहे. त्यातून पुणे शहराला पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो, अशी भूमिका निकम यांनी मांडली आहे. दरम्यान, पुण्यात रोजगार, व्यवसाय, बांधकाम आणि शिक्षणासाठी आलेल्या १५ ते २० लाख स्थलांतरित नागरिक आणि विद्यार्थ्यांची गणना करून त्यानुसार शहराचा पाणी कोटा वाढवून द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. तसेच शहरातील सध्याच्या १३ टक्के पाणीकपातीत आणखी वाढ स्वीकारण्यापूर्वी जलसंपदा विभागाकडून नऊ महत्त्वाच्या मुद्द्यांवरील माहिती मागवावी, असा स्वतंत्र ठरावही त्यांनी सादर केला आहे.

केवायसी सुरू झाल्याच्या अफवेने महिलांची धावपळ; लाडकी बहीण योजनेबाबत अधिकृत घोषणा नसतानाही केंद्रांवर गर्दी

मंगळवेढा : दैनिक संध्या



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा बंद झालेला लाभ सुरू ठेवण्यासाठी ई-केवायसी (e-KYC) करणे बंधनकारक आहे. मात्र, गेल्या ३१ मार्चपासून ही प्रक्रिया तांत्रिक कारणास्तव बंद असतानाही, कालपासून सोशल मीडियावर 'केवायसी सुरू झाल्याचे दिशाभूल करणारे संदेश व्हायरल होत आहेत. या अफवांमुळे परिसरातील थमहिलांची मोठी पळापळ होत असून, महिला व बालविकास विभागाने या वृत्ताला अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा दिला नाही. 31 डिसेंबर 2025 पर्यंत या लाभासाठी ई केवायसी बंधनकारक होते. यासाठी सरसकट मुदतवाढ न देता फक्त चुकलेल्या महिलांसाठी 31 मार्चची मुदतवाढ दिली. अनेक महिला याची केवायसी करण्यापासून वंचित राहिल्या परंतु यासाठी महिला बालकल्याण विभागाने कसलीही मुदतवाढ दिली नाही. अशातच कालपासून व्हॉट्सॲप आणि फेसबुकवर केवायसी पुन्हा सुरू झाल्याचे मेसेज फिरू लागले आहेत. या मेसेजवर विश्वास ठेवून ग्रामीण व शहरी भागातील महिलांनी घरची कामे सोडून महा-ई-सेवा केंद्रे, सेतू कार्यालये आणि सीएससी (CSC) केंद्रांवर गर्दी केली. प्रत्यक्षात शासकीय पोर्टलवर केवायसीची कोणतीही सुविधा अद्याप सुरू झालेली नाही. त्यामुळे केंद्रांवर गेलेल्या महिलांना रिकाम्या हाताने परत जावे लागत असून त्यांचा नाहक वेळ आणि पैसा खर्च होत आहे. काही सी एस सी चालकाने सर्वर सुरू असतानाच केवायसी होते असे सांगून त्या महिलांना परत पाठवले.

लाडकी बहीण योजनेची केवायसी सुरू करण्याबाबत शासनाकडून अद्याप कोणताही पत्रकार करण्यात आलेला नाही व तशी माहिती आमच्या कार्यालयाला वरिष्ठ कार्यालयाकडून उपलब्ध झालेली नाही.

- सुवर्णा जाधव प्र.बालविकास प्रकल्प अधिकारी मंगळवेढा.

लडकी बहीण योजनेची केवायसी सुरू करण्याबाबत अध्याप कोणत्याही सूचना नसताना सुरू झाल्याचे संदेश पाठवून महिलांना फसवण्याचे प्रकार वाढले आहेत प्रशासनाने योग्य तो खुलासा करून वंचित महिलांची हेळसांड थांबवावी.

- जयश्री शिंदे पंचायत समिती सदस्या मंगळवेढा

रिंगरोडच्या मोजणीला बाधित शेतकरी व जागामालकांचा विरोध

आधी जागेचा आणि बांधकामाचा दर निश्चित करा, नंतरच मोजणी करा; नागरिकांची मागणी

■ कात्रज (दै. संध्या)

पुणे महानगरपालिकेच्या ६५ मीटर इनर रिंगरोडच्या अनुषंगाने गुजर-निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, जांभूळवाडी आणि आंबेगाव परिसरात प्रस्तावित रस्त्याच्या मोजणीला बाधित जागामालकांनी विरोध केला. मंगळवारी (ता. १७) सकाळी साडेदहाच्या सुमारास पुणे महापालिका, पीएमआरडीए आणि महसूल विभागाचे अधिकारी मोजणीसाठी संबंधित ठिकाणी उपस्थित झाले होते. मात्र, जागेचा आणि बांधकामाचा मोबदला निश्चित केल्याशिवाय मोजणी करू देणार नाही, अशी भूमिका नागरिकांनी घेतली.

'आमचा मोजणीला विरोध नाही; मात्र शासनाने जागेचा आणि बांधकामाचा दर निश्चित न करता मोजणी करून आम्हाला अंधारात ठेवू नये. आधी मोबदल्याचे दर



निश्चित करावेत आणि त्यानंतर मोजणी करावी, अशी मागणी बाधित नागरिकांनी केली. तसेच या प्रश्नावर वरिष्ठ स्तरावर बैठक घेण्यात यावी. या बैठकीला संबंधित विभागांचे अधिकारी आणि लोकप्रतिनीधींनीही उपस्थित राहावे, अशी मागणीही नागरिकांनी केली. यावेळी सुमारे २०० ते २५० नागरिक एकत्र आले होते. संभाव्य कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेऊन भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याच्या वतीने घटनास्थळी बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नागरिकांच्या विरोधामुळे मोजणीचे काम तात्पुरते स्थगित करण्यात आले. या प्रश्नावर २० नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक होणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या बैठकीत बाधित नागरिकांच्या मागण्यांबाबत काय निर्णय होतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

१२ नोव्हेंबर २०२५ रोजी होणारी संयुक्त मोजणी ग्रामस्थांनी नुकसानभरपाईबाबत स्पष्टता नसल्याने रद्द केली होती. मात्र, ११ नोव्हेंबरच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी मोजणीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केल्यानंतर शेतकऱ्यांनी संयुक्त मोजणीस संमती दर्शविली होती. मात्र, त्यानंतरही कोणतीही स्पष्टता नसल्याने आज (ता. १७) परत विरोध करण्यात आला.

जांभूळवाडी, गुजरवाडी, मांगडेवाडी येथून जाणाऱ्या पीएमआरडीएच्या प्रस्तावित ६५ मीटर रुंद इनर रिंग रोडच्या भूसंपादनाबाबत ११ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या या बैठकीत बाधित शेतकऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा करण्यात आली. भूसंपादनासाठी २०१३ च्या कायद्यातील कलम २६ ते ३० नुसार खासगी वाटाघाटीद्वारे जमिनीचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. यासाठी लगतच्या गावांतील समतुल्य जमिनींच्या खरेदी-विक्रीचे दर विचारात घेण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले होते. पूर्णपणे भूमिहीन व बेघर होणाऱ्या शेतकऱ्यांना आवास योजनेतून घर देण्याबाबत प्रस्ताव करण्याच्या सूचनाही देण्यात आले. मात्र, तसे प्रत्यक्षात काहीही नसल्याने आम्ही ग्रामस्थांनी विरोध केला असल्याचे नितिन जांभळे यांनी सांगितले.

ग्रामस्थांनी विरोध केल्याने आज मोजणी थांबवावी लागली. आता जागामालक आणि प्रशासन यांच्यात संयुक्त बैठक होईल. त्यांनतर पुढील निर्णय होईल.

- विकास फुके, मंडळ अधिकारी, भूसंपादन



डॉ. प्रियांका गोरे यांचा सन्मान

■ चाकण (दै. संध्या)

न्यूरोसायन्स विषयात पीएचडी पदवी संपादन केल्याबद्दल डॉ. प्रियांका सुरेश गोरे यांचा चाकण येथे निवृत्त कामगार, शिक्षक संघटना व पत्रकार बांधवांच्या वतीने गौरव करण्यात आला. चाकण येथे डॉ. प्रियांका गोरे यांचा एसटी डेपोतील निवृत्त कामगार सयाजी कुटे, पंडित खांडेभराड, निवृत्त शिक्षक टी.एन. थोरात, आदर्श शिक्षक राजेंद्र खरमाटे, सुरेश गोरे व पत्रकार अशोक टिळेकर आदींच्या हस्ते डॉ.प्रियांका यांचा सन्मान करण्यात आला.

श्री क्षेत्र लेण्याद्री येथे २० नोव्हेंबरला भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन

■ नारायणगाव (दै. संध्या)

सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेचा वसा घेवून ग्रामीण व दुर्गम भागातील सर्वसामान्य नागरिकांना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजु रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी तसेच आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित असलेल्या गरजू रुग्णांना योग्य व मोफत वैद्यकिय उपचारांचा लाभ मिळावा, या उदात्त हेतूने श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्ट, गोळेगाव यांच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष,पुणे आणि डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये सर्व रोगांची मोफत तपासणी, विविध आजारांवरील उपचार तसेच आवश्यक शस्त्रक्रियांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदरचे शिबिर श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्टच्या यात्रीनिवास भाग नंबर २, गोळेगाव, ता. जुन्नर, जि. पुणे येथे शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३.३० या वेळेत होणार आहे. या महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, पुणेचे अध्यक्ष डॉ. मानसिंग साबळे उपस्थित राहणार आहेत.

या शिबिरासाठी विविध नामांकित रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये व आरोग्य संस्थांचे सहकार्य लाभणार असून त्यामध्ये पुणे व जुन्नर परिसरातील अनेक वैद्यकीय संस्था सहभागी होणार आहेत. तरी सर्व नागरिकांनी, ज्येष्ठ नागरिकांनी, महिला-भगिनींनी तसेच गरजू रुग्णांनी या शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन श्री लेण्याद्री गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. या शिबिरासाठी रुग्णांची ने- आण करण्याकरिता लेण्याद्री फाटा येथून वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. अशी माहीती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे व सचिव शंकर ताम्हाणे यांनी दिली.

तसेच या शिबिरास जुन्नर तालुक्याचे आमदार शरददादा सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके आणि विघ्नहर सहकारी साखर कारखानाचे चेअरमन सत्यशील शेरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या शिबिरामध्ये मोफत नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, हृदयरोग व मधुमेह तपासणी, कर्करोगाची पूर्व तपासणी व जनजागृती, हाडांचे व सांधेदुखीचे आजार, कान-नाक-घसा तपासणी, दंत तपासणी, बालरोग, त्वचारोग, बी.पी., शुगर व रक्ताशी संबंधित विविध तपासण्या करण्यात येणार असुन आयुर्वेदिक उपचार, व्यायाम मार्गदर्शन, मोफत औषधांचे व चष्मे वाटप आणि आवश्यक रुग्णांवर विविध शस्त्रक्रियांची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. विशेष बाब म्हणजे, या शिबिराच्या माध्यमातून ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी आयुष्मान वय वंदना योजनेंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारांसाठी नावनोंदणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. गरजू नागरिकांना मोफत श्रवण यंत्र मिळण्यासाठी पूर्वतपासणी व नावनोंदणीची सुविधाही उपलब्ध असेल. दिव्यांग व्यक्तींना आवश्यक साहित्याचे वाटप करण्यापूर्वी तपासणी व नावनोंदणी करण्यात येणार असून व्हीलचेअर, तीन चाकी सायकल, वॉकर, स्टिक, कृत्रिम हात-पाय, कुबड्या व कॅलिपर आदी साहित्य उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

श्रीकृष्ण मंदिराचा ४३वा वर्धापनदिन, पंचावतार उपहार, संन्यास दीक्षाविधी, महंती प्रतिष्ठा आणि आचार्यश्रींचा अमृतमहोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा

अमृतमहोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा

■ शिक्रापूर (दै. संध्या)


महानुभाव पंथाच्या गौरवशाली धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा वारसा जतन करणारा सप्तविध धार्मिक सोहळा शिक्रापूर येथे अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. कार्तिक शुद्ध पंचमी व षष्ठी, शके १९४८, शनिवार, दि. १४ व रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी पुणे-नगर महामार्गावरील श्रीकृष्ण मंदिर, महानुभाव आश्रम, शिक्रापूर येथे दोन दिवस हा भव्य धार्मिक सोहळा पार पडला. या सोहळ्यानिमित्त श्रीकृष्ण मंदिराचा ४३ वा वर्धापनदिन, पंचावतार उपहार महोत्सव, संन्यास दीक्षाविधी, महंती प्रतिष्ठा, आचार्यश्रींचा अमृतमहोत्सव, आचार्यश्रींची तुला तसेच महानुभावीय पंजाबी कुळाचा भव्य स्नेहमेळावा अशा विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे पंजाबी कुलाचार्य महंत श्रीकृष्णराजबाबा शास्त्री पंजाबी, शिक्रापूर तथा सचिव, अखिल भारतीय महानुभाव परिषद यांचा अमृतमहोत्सव. या अमृतमहोत्सवानिमित्त शिक्रापूर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. धार्मिक जयघोष, पारंपरिक वातावरण आणि भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. या धर्मसभेच्या अध्यक्षस्थानी उपाध्य कुलाचार्य आचार्य श्री बिडकर बाबाजी रणाईचे होते, तर कार्याध्यक्षपदाची जबाबदारी कवीश्वर कुलाचार्य आचार्य श्री कारंजेकर बाबाजी, अमरावती यांनी सांभाळली. महानुभाव पंथातील अनेक प्रतिष्ठित संत, महंत, आचार्य, विद्वान, धर्मप्रचारक आणि धर्मप्रेमी भाविकांनी उपस्थिती लावून या सोहळ्याची शोभा वाढविली. या कार्यक्रमातील महत्त्वपूर्ण धार्मिक पर्व म्हणजे धर्मकुमार नरेंद्र बाबाजी भापकर, हिवरे यांचा संन्यास दीक्षाविधी.



महानुभाव पंथाच्या गौरवशाली परंपरेला उजाळा देणारा, धार्मिक संस्कारांची जोपासना करणारा आणि भावी पिढीला अध्यात्माची प्रेरणा देणारा हा सप्तविध सोहळा असंख्य संत-महंत, आचार्य, मान्यवर आणि भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या ऐतिहासिक आणि अविस्मरणीय सोहळ्यामुळे महानुभाव पंथाच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

हा विधी पारंपरिक धार्मिक रीतीरिवाजांनुसार अत्यंत मंगलमय आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यासाठी दिल्ली, अमृतसर, चंदीगड तसेच उत्तर प्रदेशासह देशाच्या विविध भागांतून संत-महंत आणि महानुभावीय भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दीक्षाविधीमुळे महानुभाव पंथाच्या आध्यात्मिक परंपरेतील नव्या पर्वाची सुरुवात झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. दोन दिवस चाललेल्या धर्मसभेत विविध संत-महंत आणि आचार्यश्रींच्या प्रवचनांचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या प्रवचनांतून महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान, धर्मज्ञान, आचारविचार, साधना, गुरुभक्ती आणि पंथीय संस्कार यांचे महत्त्व विशद करण्यात आले. प्रवचनरूपी ज्ञानामृताचा लाभ उपस्थित भाविकांना मिळाला. तसेच महानुभावीय पंजाबी कुळाच्या स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून समाजातील एकोपा, बंधुभाव, संघटन आणि धार्मिक परंपरांचे जतन करण्याचा संदेश देण्यात आला.

या भव्य सप्तविध धार्मिक सोहळ्याचे आयोजन आचार्यप्रवर महंत श्री राजधरबाबा महानुभाव, संवत्सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. भक्ती, ज्ञान, गुरुभक्ती, धार्मिक परंपरा आणि सामाजिक एकात्मता यांचा सुंदर संगम या दोन दिवसीय सोहळ्यात अनुभवायला मिळाला.



पुणे-सोलापूर महामार्गावर लक्झरी बसचा भीषण अपघात

■ लोणी काळभोर (दै. संध्या)

पुणे-सोलापूर महामार्गावर हवेली तालुक्यातील गावच्या हद्दीत भरधाव लक्झरी बसने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या टेम्पो ट्रॅव्हलरला पाठीमागून जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत टेम्पोमधील तीन तृतीयपंथी जखमी झाले असून अन्य दोघांना किरकोळ दुखापत झाली आहे. जखमींना तातडीने कुंजीरवाडी येथील मोरया हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. सोमवारी (ता. १६) पहाटे साडेचारच्या सुमारास हॉटेल सत्कार ग्रँड लॉजसमोर हा अपघात घडला. रुबीना ताज (वय ४५), सानिया (वय ३८) आणि कवाना (वय ३०) अशी जखमींची नावे आहेत. याप्रकरणी नासिर फरीदशहा जमादार (वय ४७, रा. मिरज, जि. सांगली) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार लक्झरी बसचालक मोहम्मद समीर खाशीनसाहब मुल्ला (वय २६, रा. एरंडी, ता. हुमनाबाद, जि. बिदर) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नासिर जमादार हे आपल्या फोर्स मोटर्सच्या टेम्पो ट्रॅव्हलरमधून सात तृतीयपंथीयांना घेऊन मिरज येथून थेऊरमधील वृंदावन मंगल कार्यालयात आयोजित संमेलनासाठी आले होते. पहाटे लवकर पोहोचल्याने फ्रेश होण्यासाठी खोली मिळते का, याची चौकशी करण्यासाठी त्यांनी हॉटेल सत्कार ग्रँड लॉजसमोर वाहन उभे केले होते. जमादार हे दोन तृतीयपंथीयांसह लॉजमध्ये चौकशीसाठी गेले असताना अन्य पाच जण वाहनातच थांबले होते. याचवेळी हैदराबादहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या ट्रान्स इंडिया कंपनीच्या लक्झरी बसने (एमपी ०१ झेडजी ९९२२) उभ्या असलेल्या टेम्पो ट्रॅव्हलरला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेमुळे वाहनातील तिघे जखमी झाले, तर दोघांना किरकोळ दुखापत झाली. अपघातात टेम्पोचेही मोठे नुकसान झाले आहे. बसचालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात बस चालविल्याने अपघात झाल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

पुणे जिल्ह्यातील स्थानिक कबड्डीपटूंना 'धर्मवीर लीग'चे व्यासपीठ!

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आयोजन

संलग्न संघांना प्रत्येकी १० खेळाडूंची नोंदणी करता येणार

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील स्थानिक कबड्डीपटूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून 'धर्मवीर कबड्डी प्रीमियर लीग २०२६' आयोजित करण्यात येत आहे. पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनतर्फे ही लीग आयोजित केली जात असून, खेळाडूंच्या नावनोंदणीसाठी संयोजन समितीने सूचना जारी केल्या आहेत.

स्थानिक मैदानांवर खेळणाऱ्या नवोदित आणि गुणवंत खेळाडूंना स्पर्धात्मक कबड्डीत पुढे जाण्याची संधी मिळावी, हा लीगचा उद्देश आहे. पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनशी संलग्न प्रत्येक संघाला आपल्या संघातील १८ वर्षांवरील जास्तीत जास्त १० खेळाडूंची नावनोंदणी करता येणार आहे. संघ व्यवस्थापकांनी प्रत्येक खेळाडूचा विहित नमुन्यातील स्वतंत्र अर्ज भरावा. अर्जासोबत खेळाडूचा फोटो, त्याची स्वाक्षरी आणि संघाची अधिकृत शिफारस आवश्यक आहे. नोंदणीसाठी सुचविलेल्या खेळाडूंची नावे संस्थेच्या अधिकृत लेटरहेडवर नमूद करून त्यावर अध्यक्ष किंवा सचिवांची स्वाक्षरी घ्यावी. स्वतंत्र अर्ज आणि स्वाक्षरीयुक्त यादी संयोजन समितीकडे सादर करावी, असे सूचनेत नमूद आहे. निवड चाचणीत पात्र ठरणाऱ्या खेळाडूंची लीगसाठी निवड लिलाव पद्धतीने केली जाणार आहे. लीगमधील सामन्यांचे थेट प्रक्षेपण करण्याचेही नियोजन असल्याचे आयोजकांनी पत्रकात नमूद केले आहे. शनिवार, २१ आणि रविवार, २२ नोव्हेंबर २०२६ या तारखा दिल्या आहेत. तसेच कै. मारुती रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल, बापुजी चौक, भोसरी हे स्थळ नमूद आहे. नोंदणी सूचनेच्या मुख्य मजकुरात निवड चाचणीची तारीख स्वतंत्रपणे जाहीर केली जाईल, असे म्हटले आहे. त्यामुळे चाचणीसाठी उपस्थित राहण्यापूर्वी संघांनी अंतिम तारीख आणि सत्राची वेळ संयोजन समितीकडून जाणून घ्यावी. तसेच, पुणे जिल्ह्यातील कबड्डीपटूंच्या नावनोंदणीसाठी सुनील लांडे- 9764351551 आणि मच्छिंद्र लांडगे- 9834418030 यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन केले आहे.

"पुणे जिल्ह्यातील स्थानिक कबड्डीपटूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी, हा 'धर्मवीर कबड्डी प्रीमियर लीग'चा उद्देश आहे. पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनशी संलग्न संघांनी आपल्या संघातील १८ वर्षांवरील जास्तीत जास्त १० खेळाडूंची नावनोंदणी करावी. नवोदित खेळाडूंना या संधीचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशिक्षक आणि संघ व्यवस्थापकांनी पुढाकार घ्यावा."

- सुनील लांडे, समन्वयक, धर्मवीर कबड्डी लीग.